रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २२१ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## भारताचा जीडीपी घसरण्याची शक्यता

**नवी दिल्ली :** भारताची सकल देशांतर्ग उत्पादन वाढ (जीडीपी) २०२५ या आर्थिक वर्षात ६.४ टक्के राहण्याची शक्यता अर्थमंत्रालयाने मंगळवारी व्यक्त केली आहे. ही शक्यता २०२४ या आर्थिक वर्षातील ८.२ टक्क्यांच्या जीडीपीपेक्षा खूप कमी आहे. तर, रिझर्व्ह बँकेने यापूर्वी २०२५ मध्ये देशाचा जीडीपी ६.६ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला होता. मागील आर्थिक धोरणाच्या बैठकीत, रिझर्व्ह बँकेने २०२५ या आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी ६.६ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ६.८ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ७.२ टक्के राहील असे म्हटले होते. दरम्यान, २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी ६.९ टक्के आणि दुसऱ्या तिमाहीत ७.३ टक्के राहिल असा अंदाज वर्तवला होता.


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ८ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


## सर्वोच्च न्यायालयाकडून संपात व्यक्त

**नवी दिल्ली :** जिल्हा कोर्टाच्या न्यायाधीशांचे वेतन आणि पेन्शन यावरून सरकारच्या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. सर्व राज्य सरकारकडून मोफत वाटप केल्या जाणाऱ्या रकमेचा उल्लेख करत जे कुणी काम करत नाही त्यांच्यासाठी तुमच्याकडे पैसे आहेत, पण जेव्हा न्यायाधीशांच्या वेतन आणि पेन्शनचा मुद्दा येतो, तेव्हा आर्थिक समस्येचा हवाला दिला जातो, असं न्यायालयाने म्हटले आहे. ऑल इंडिया जजेस असोसिएशन नावाच्या संस्थेकडून दाखल याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ही टिप्पणी केली.

# ..तर रेवस-रेड्डीला विरोध

## द्रोणागिरीच्या अस्तित्वासाठी करंजाकर एकवटले

| उरण | वार्ताहर |

**रायगड जिल्ह्यातील करंजा-रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडीपर्यंतच्या सागरी महामार्गाच्या कामाला शासनाने सुरुवात करण्याचा घाट घातला आहे. परंतु, सदर सागरी महामार्ग हा ऐतिहासिक ठेवा असणाऱ्या द्रोणागिरी पर्वताला धक्का लावून तयार होत असेल तर या सागरी महामार्गाच्या कामाला चाणजे प्रकल्पबाधित स्थानिक शेतकरी, करंजा ग्रामस्थ, जमीनधारक, सामाजिक कार्यकर्ते, कोंढरी ग्रामस्थ यांचा विरोध राहणार आहे. तरी शासनाने या परिसरातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन आणि द्रोणागिरी पर्वताला धक्का न लागता रेवस ते रेड्डी हा सागरी महामार्ग तयार करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी केली.**



मुंबई-गोवा महामार्गाला पर्यायी ठरणारा रायगड जिल्ह्यातील करंजा-रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डीपर्यंतच्या सागरी महामार्गाचे भूमीपूजन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रेवस (रायगड) ते रेड्डी (सिंधुदुर्ग) या सागरी महामार्गावरील सात खाडी पुलांच्या कामाचे भूमीपूजन करण्यात आले होते. या रेवस ते रेडी या सागरी महामार्गाची एकूण लांबी ४९८ किमी इतकी आहे. पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा हा सागरी महामार्ग असणार आहे. मात्र, सदर महामार्ग हा उरण तालुक्यातील चाणजे या परिसरातून जात असताना या ठिकाणावरील शेतकरी, ग्रामस्थ, सामाजिक संस्था यांना विश्वासात न घेता भूसंपादन, जागेचा सर्व्हे करण्यास शासनस्तरावर प्रयत्न करत आहे. तसेच उरण तालुक्यातील ऐतिहासिक ठेवा असणाऱ्या द्रोणागिरी पर्वताला धक्का पोहोचविण्याचा घाट घालत आहे. त्यामुळे प्रकल्पबाधित स्थानिक शेतकऱ्यांनी, सामाजिक संस्था यांनी रेवस ते रेड्डी सागरी महामार्गाच्या कामाला विरोध दर्शविला.

करंजा रेवस ते रेड्डी सागरी सेतुच्या जागेच्या मोजणीसंदर्भात पवन चांडक उपविभागीय अधिकारी पनवेल •> पान २ वर

### अधिकाऱ्यांची चिडीचूप

**रेवस ते रेड्डी सागरी महामार्गासंदर्भात उप विभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक तसेच उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांना विचारणा केली असता त्यांनी बोलण्यास नकार दर्शविला आहे.**

# राजकीय पटलावर वावटळ उठणार

- स्वराज्य संस्थांसाठी २२ जानेवारीला सर्वोच्च सुनावणी
- ग्रामीण कारभारावर शेकापचे वर्चस्व

| आविष्कार देसाई |
| रायगड |

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. आता स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. मात्र, सध्या सर्वोच्च न्यायालयात याबाबतचे प्रकरण गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित आहे. आधीच्या राजकीय परिस्थितीनुसार स्वराज्य संस्थांच्या कारभारावर शेकापचे वर्चस्व असल्याचे दिसते. सध्या राज्यातील राजकीय परिस्थिती बदलेली आहे. त्यामुळे युत्या-आघाड्या, कोण कोणाच्या गळ्यात गळे घालणार की एकला चलो रेचा नारा देणार, हे २२ जानेवारीच्या निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे आगामी कालावधीत राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे.

राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे.

महापालिकेसोबत स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांच्या संख्येची निश्चिती, प्रभाग रचना, सदस्य संख्या निवडणूक आयोगाने निश्चित करायची की राज्य सरकारने, ओबीसी आरक्षण या मुद्द्यावर सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे सुरू आहेत. २२ तारीख असली तरी त्याआधीदेखील प्रकरण बोर्डवर घेऊन सुनावणीची विनंती करण्यात आली तर कदाचित सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लवकरात लवकर येऊ शकेल आणि त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचे भवितव्य निश्चित होईल, अशी आशा आहे.

लोकसभेसह विधानसभा निवडणुकाही संपल्या असून, स्थिर सरकार सत्तेत आले आहे. त्यामुळे महायुती सरकार लवकरात लवकर या निवडणुका घेईल, अशी अपेक्षा आहे. महायुतीला स्पष्ट बहुमत दिल्यामुळे सध्या चांगले वातावरण असल्याने याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न महायुती सरकार सोडेल असे दिसत नाही.

### रायगड जिल्हा परिषद पक्षीय बलाबल

| पक्ष | संख्या |
|---|---|
| शेकाप | 23 |
| शिवसेना | 18 |
| राष्ट्रवादी काँग्रेस | 12 |
| काँग्रेस | 03 |
| भाजपा | 03 |

### नगराध्यक्ष

| पक्ष | संख्या |
|---|---|
| काँग्रेस | 2 |
| शिवसेना | 3 |
| राष्ट्रवादी काँग्रेस | 3 |
| उरण | 1 |
| शेकाप | 1 |

### नगराध्यक्ष- ब्रेकअप

१) अलिबाग नगर परिषद- शेकाप
२) पेण नगर परिषद -काँग्रेस
३) कर्जत नगर परिषद -शिवसेना
४) माथेरान नगर परिषद -शिवसेना
५) रोहे नगर परिषद - राष्ट्रवादी काँग्रेस
६) खोपोली नगर परिषद - राष्ट्रवादी काँग्रेस
७) महाड नगर परिषद -काँग्रेस
८) मुरुड नगर परिषद -शिवसेना
९) उरण नगर परिषद -भाजपा
१०) श्रीवर्धन नगर परिषद -राष्ट्रवादी काँग्रेस

### १) पनवेल महानगर पालिका- भाजपा



### पंचायत समित्यांवर शेकापचाच प्रभाव

१) अलिबाग पंचायत समिती-शेकाप, २) पेण पंचायत समिती-शेकाप ३) पनवेल पंचायत समिती-शेकाप ४) उरण पंचायत समिती- शेकाप ५) कर्जत पंचायत समिती-शिवसेना ६) खालापूर पंचायत समिती- राष्ट्रवादी काँग्रेस ७) रोहे पंचायत समिती- राष्ट्रवादी काँग्रेस ८) मुरुड पंचायत समिती-शेकाप,९) तळा पंचायत समिती-राष्ट्रवादी काँग्रेस १०) पाली-सुधागड पंचायत समिती-राष्ट्रवादी काँग्रेस-शेकाप आघाडी ११) म्हसळा पंचायत समिती- राष्ट्रवादी काँग्रेस १२) माणगाव पंचायत समिती- शिवसेना १३) महाड पंचायत समिती- शिवसेना १४) पोलादपूर पंचायत समिती-काँग्रेस-शेकाप आघाडी १५) श्रीवर्धन पंचायत समिती- शिवसेना

## वेधक

### आसाराम बापूला अंतरिम जामीन

**नवी दिल्ली :** अल्पवयीन मुलीवरील बलात्कारप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला स्वयंघोषित आध्यात्मिक गुरू आसाराम बापू याला सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि.७) अंतरिम जामीन मंजूर केला. १५ मार्चपर्यंतच्या अंतरिम जामीन काळात पुराव्यांशी छेडछाड करु नये, अनुयायांना भेटू नये, असे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. बलात्कारप्रकरणी आसाराम बापू हा जोधपूर मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. न्यायालयाने जामीन मंजूर करताना त्याने अनुयायांना भेटू नये असे निर्देश दिले आहेत.

### राज्यात गारठा वाढला

**पुणे :** राज्यामध्ये पुढील तीन दिवस थंडीचे राहणार आहेत. शुक्रवार (दि.१०) पर्यंत माफक थंडीचा अनुभव संपूर्ण कोकण व महाराष्ट्रात जाणवेल, असा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. मंगळवारी (दि.७) मुंबईसह कोकणात पहाटेचे किमान तापमान सरासरीच्या खाली घसरल्याचे पाहावयास मिळाले. उत्तर भारतात समुद्रसपाटीपासून दहा ते बारा किमी उंचीवर पश्चिम दिशेकडून ताशी २५० ते २६० किमी वेगाने प्रवाही झोताचे पश्चिमी वारे वाहत आहेत. त्यामुळे एकत्रित परिणामातून महाराष्ट्राकडे थंडी वाढण्याचा स्रोत अजून तीन दिवस कायम राहील, अशी माहिती हवामानतज्ज्ञांनी दिली.

# पितापुत्राला मारहाण, आरोपींना पिझ्झा बर्गर?

## रेवदंडा पोलिसांकडून बडदास्त

| चौल | प्रतिनिधी |

पुण्यावरुन आलेल्या पर्यटकांनी चौल-भाटगल्ली येथील पितापुत्राला मारहाण केल्याची घटना सोमवारी (दि. ६) सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास घडली. अरुण घरत आणि सुयोग घरत अशी मारहाण झालेल्यांची नावे आहेत. त्यानंतर मोठा वादाचा प्रसंग याठिकाणी ओढावला होता. राजकीय वरदहस्त असलेल्या नाशिक पंचवटी येथील पर्यटकांकडून घटनास्थळी अरेरावीची भाषा करण्यात येत होती. हा वाद शेवटी रेवदंडा पोलीस ठाण्यात गेला. पोलीस ठाण्यात पर्यटकांना पिझ्झा बर्गर मागवत त्यांची चांगली बडदास्त राखण्यात आल्याचा दावा घरत पितापुत्रांनी केला आहे.

दरम्यान, या आरोपाचे रेवदंडा पोलिसांकडून खंडन करण्यात आले आहे. जवळपास दहा तासांनंतर रात्री उशिरा या घटनेत परस्परांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत •> पान २ वर






> मला व माझ्या वडिलांना पर्यटक महिला व पुरुषांकडून हाताबुक्क्याने मारहाण करण्यात आली आहे. आम्हाला पोलीस ओरडून भीती दाखवण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, पर्यटकांची चांगली बडदास्त राखली जात होती. पोलिसांची कार्यपद्धती संशयास्पद वाटते.
> – सुयोग घरत, तक्रारदार, चौल

> दोन्ही पार्ट्यांमध्ये आपसात याविषयी चर्चा सुरू होती. परंतु, प्रकरण न मिटल्याने शेवटी रात्री उशिराने दोन्ही बाजूकडील लोकांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांकडून कोणाचीही बाजू घेण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे पर्यटकांसोबत लहान मुले असल्याने त्यांनी त्यांच्यासाठी वडापाव आणले होते. पिझ्झा बर्गर पोलीस ठाण्यात आणले नाहीत. – श्रीकांत किरवले,
> सहाय्यक पोलीस निरीक्षक, रेवदंडा पोलीस ठाणे

### दहा तास आणि बारा पिझ्झा

**आरोपींसाठी अलिबाग येथील डॉमिनोझमधून रात्रीच्या सुमारास पंधरा पिझ्झा बर्गर डिलिव्हरी बॉय घेऊन आल्याची माहिती घरत आणि त्यांच्यासोबत असलेले नातेवाईक आणि मित्रमंडळींनी दिली. दरम्यान, साडेअकाराच्या सुमारास झालेल्या अपघाताबाबत गुन्हा दाखल करण्यास जवळपास दहा तास का लागले, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. आरोपींना राजकीय वरहस्त असल्याने मंत्रालयातून त्यांच्यासाठी पोलिसांना फोन येत होते, अशी चर्चा पोलीस ठाणे परिसरात रंगली होती.**

# आरोग्य सेवेच्या ढिसाळ कारभाराविरोधात मूक मोर्चा

## महाडकरांकडून निषेध व्यक्त

| महाड | प्रतिनिधी |

महाडमधील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांची आणि वैद्यकीय पदांची कमतरता असल्यामुळे या ठिकाणी योग्य उपचार मिळत नसल्याने रुग्ण दगावत आहेत. याबाबतीत अनेक वेळा चर्चा होऊनदेखील कायम दुर्लक्ष केले गेले आहे. काही दिवसांपूर्वी महामार्गावर झालेल्या अपघातात महाडमधील चार जणांचा मृत्यू झाला होता. यातील जखमींवर योग्य उपचार झाला नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे ट्रॉमा केअरबाबत अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा महाडकरांनी मूक मोर्चाद्वारे दिला आहे.

महाड शहरामध्ये शासनाकडून महान ग्रामीण रुग्णालयाच्या शेजारीच महाड •> पान २ वर




# न्याय्य हक्कासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

## खारेपाट विभागातून आत्मदहनाचा इशारा

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात नवनव्याने प्रकल्प व उद्योगधंदे उभारले जात आहेत. अशातच औद्योगिकीकरणाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेतल्या जात आहेत. मात्र, अनेक वर्षे इथं कोणताही प्रकल्प उभारला जात नसून, या जमिनी पडीक राहता असल्याने शेतकरीवर्गात असंतोष उफाळून येत आहे. धाकटे शहापूर, मोठे शहापूर, धेरंड, खारेपाट विभागातील हजारो शेतकऱ्यांनी न्याय्य हक्कांसाठी एल्गार पुकारला आहे.

पूर्व भूसंपादन व सद्य पुनर्संपादनातील संपादन संस्थांकडून गैरकारभार होत असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. खारेपाटातील ३००० एकर शेतजमिनीपैकी ८०० एकर कृषी व ४०० एकर अकृषी जमिनी २००६ साली टाटा विद्युत प्रकल्पासाठी संपादित करण्यात आल्या. यापैकी ७० टक्के जमिनी सलोख्याने व ३० टक्के जमिनी •> पान २ वर





> कायद्यानुसार आमच्या जमिनीची किंमत एकरी १ कोटी ६४ लाख होते, याचे पाच वर्षांचे व्याज दिले पाहिजे, तसेच सिडकोने ज्याप्रमाणे विकास भूखंड दिला गेला, तसाच साडेबारा टक्के भूखंड आम्हाला दिला जावा, तसेच घरोघरी नोकरी द्यावी तरच आम्ही या प्रकल्पाला सहकार्य करू अन्यथा आमचा प्रकल्पाला कडाडून विरोध राहील.
> – अनिल पाटील, सचिव, शेतकरी संघर्ष समिती

# दिल्ली विधानसभेचे बिगुल वाजले

- ५ फेब्रुवारीला मतदान, ८ फेब्रुवारीला मतमोजणी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. निवडणुका एकाच टप्प्यात होणार असून, ५ फेब्रुवारीला मतदान, तर मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार यांनी मंगळवारी (दि. ७) पत्रकार परिषद घेत निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यानुसार विधानसभा निवडणुकीची अधिसूचना १० जानेवारी रोजी निघणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १७ जानेवारी आहे. उमेदवारी अर्जांची छाननी करण्याची तारीख १८ जानेवारी आहे. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख २० जानेवारी असेल. त्याचप्रमाणे ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. तर ८ फेब्रुवारीला मतमोजणी होत निकाल जाहीर होणार आहेत.

दिल्ली विधानसभेच्या एकूण ७० जागांसाठी ही निवडणूक होत आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने (आप) भाजप आणि काँग्रेसला धोबीपछाड देत •> पान २ वर



# अवघ्या अर्ध्या तासात बैठक आटोपली

## १ एप्रिलपासून सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्याची पहिली कॅबिनेट बैठक अवघ्या ३० मिनिटांत उरकण्यात आली. या कमी कालावाधीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने फास्ट टॅगबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. शासनाच्या प्रचलित सार्वजनिक खासगी सहभाग धोरण-२०१४ मध्ये सुधारणा करणार असून, १ एप्रिल २०२५ पासून राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य करण्यात आला आहे. याचबरोबर इथून पुढे होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठका पेपरलेस होणार आहेत, असाही निर्णय घेण्यात आला.

१ एप्रिलपासून सर्व वाहनांसाठी फास्ट टॅग अनिवार्य करण्यात आले आहे. टोलनाका पार करण्यासाठी सर्व वाहनांवर फास्ट टॅग लावणे सरकारकडून बंधनकारक करण्यात आले आहे. प्रवास वेगवान करण्याच्या उद्देशाने सरकारकडून हा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे आता टोलनाक्यावरील वाहनांची गर्दी कमी होणार आहे.

फास्ट टॅग प्रोग्राम ही रेडिओ फ्रिक्वेंसी आयडेंडीफिकेशन टेक्नॉलॉजीवर चालते. फास्ट टॅगमुळे टोलनाक्यावर थांबून टोल न देता फास्ट टॅगचा कोड स्कॅन करून थेट अकाऊंटमधून पैसे कापले जातात. याकरिता फास्टटॅगसोबत लिंक केलेल्या बँक वॉलेटमधून डिजिटली पैसे कापले जातात. फास्ट टॅगची वैधता पाच वर्षांची असते. तुमच्या बँक अकाऊंटमधील टोलची रक्कम आपोआप कापली जाते. फास्ट टॅगमुळे टोलनाक्यावर वाहनांची गर्दी टाळता येईल, असे म्हटले जात आहे.



### मंत्रिमंडळ निर्णय(संक्षिप्त)

**१) एप्रिल २०२५ पासून राज्यात सर्व वाहनांसाठी फास्ट-टॅग अनिवार्य. २) महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करणार. ३) ई-कॅबिनेट सादरीकरण होणार, यापुढे मंत्रिमंडळाच्या बैठका पेपरलेस होणार आहेत. तर आजच्या सादरीकरणानंतर ई-कॅबिनेट धोरणाची अंमलबजावणी होणार असल्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.**

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कुटुंबांचा होणार सन्मान | २१ ते २५ जानेवारीपर्यंत तपासणी

# १८३० गावांमध्ये ‘स्वच्छ माझे अंगण अभियान’

| रायगड | खास प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात एक हजार ८३० गावांमध्ये स्वच्छता अभियान जनजागृतीसाठी स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान २६ जानेवारीपर्यंत राबविण्यात येणार आहे.

या अभियानात स्वच्छतेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कुटुंबांचा सन्मान करण्यात येणार असून, अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

जिल्ह्यात वैयक्तिक शौचालय, शोषखड्डा, अथवा परसबाग, कंपोस्ट खत खड्डा तसेच कचरा वर्गीकरणीसाठी हिरव्या व निळ्या रंगाच्या दोन डस्टबिन असणाऱ्या कुटुंबांना घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनातील उत्कृष्ट कुटुंब म्हणून सन्मानित करण्यात येणार आहे. दि. २१ ते २५ जानेवारी या कालावधीत ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य प्रत्यक्ष गृहभेटी देऊन या चार बाबी वापरात आहेत का, याची माहिती घेणार आहेत. २६ जानेवारी रोजी या कुटुंबांचा ग्रामपंचायतीच्यावतीने सत्कार करण्यात येणार आहे. सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देऊन पात्र कुटुंबांना गौरविण्यात येईल.

ग्रामीण भागातील सर्व गावात दृश्यमान स्वच्छता राहावी, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. यामुळे स्वच्छता सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. गाव स्वच्छ, सुंदर राहण्यास याची मदत होणार असल्याने जास्तीत जास्त ग्रामस्थांनी यात सहभागी होऊन स्वच्छतेची व्याप्ती वाढवावी, असे आवाहन पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.



### प्रशस्तीपत्र देऊन सन्मान

**अभियान कालावधीत घरगुती खतखड्डा, शोषखड्डा, परसबाग, घरगुती कचराकुंड्यांचे व्यवस्थापन आदी निकष पूर्ण करणाऱ्या पात्र कुटुंबियांना दि. २६ जानेवारी रोजी ग्रामपंचायतीच्यावतीन प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सरपंच व ग्रामसेवकांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल.**

> स्वच्छतेची सवय अंगीकृत करण्यासाठी यापुढे लोकचळवळ उभी करण्याच्या उद्देशाने ‘स्वच्छ माझे अंगण अभियान’ राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. – भारत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

# शालेय विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला

## नऊगाव आगरी समाज संघटनेतर्फे तहसीलदारांना निवेदन | हल्लेखोर, शाळा व्यवस्थापनावर कारवाई करावी




**। कोर्लई । वार्ताहर ।**

**मुरुड तालुक्यातील विहूर येथील मेहबूब एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूल वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमप्रसंगी माजी सैनिक मुकेश नाक्ती यांचा मुलगा मानस याला जबर मारहाण करण्यात आली. दरम्यान, त्याचा गळा आवळून ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या हल्लेखोरांवर व शाळा व्यवस्थापनावर कारवाई करण्यात यावी. याबाबत मुरुडमधील नऊगाव आगरी समाज संघटनेतर्फे अध्यक्ष भालचंद्र पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तहसीलदारांना एक निवेदन देऊन मागणी केली आली.**

या निवेदनात म्हटले आहे की, मेहबूब एज्युकेशन ट्रस्ट, इंग्लिश मीडियम स्कूल विहूर येथे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाप्रसंगी आमचे समाज बांधव माजी सैनिक मुकेश नाक्ती यांचा मुलगा मानस मुकेश नाक्ती (१६ वर्षे) रा. शिघ्रे-मुरुड याच्यावर क्षुल्लक कारणावरून प्राणघातक हल्ला करण्यात आला. त्याचा गळा आवळून ठार मारण्याचा प्रयत्न झाला आहे. या हल्ल्यामध्ये शालेय विद्यार्थी नसून कॅन्टीन चालवणाऱ्या इसमाने व बाहेरील व्यक्तीनी मिळून हा हल्ला केला आहे, असा दावा करण्यात आला आहे.

शालेय विद्यार्थ्यांवरती असा हल्ला होणे ही अतिशय शरमेची बाब आहे. आणि या हल्ल्याचा नऊगाव आगरी समाज मुरुड तीव्र निषेध करत आहे. या संपूर्ण कार्यक्रमात शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांकरिता योग्य ती सुरक्षा व्यवस्था ठेवणे गरजेचे होते, परंतु तशी कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती. आमची या निवेदनाद्वारे आपणास विनंती आहे की, संबंधित शाळा व्यवस्थापनावर तसेच ज्या व्यक्तींनी हा हल्ला घडवून आणला, या हल्ल्यामध्ये सामील असलेले आरोपी यांच्यावर कडक कारवाई होऊन संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी. असे नऊगाव आगरी समाजातर्फे तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून, या निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, जिल्हाधिकारी-रायगड, पोलीस अधीक्षक-रायगड, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी, मुरुड पोलीस निरीक्षक, पंचायत समिती गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

यावेळी नऊगांव आगरी समाज अध्यक्ष भालचंद्र पाटील, उपाध्यक्ष मदन भोईर, माजी उपाध्यक्ष नरेश वारगे, सचिव मनोज कमाने, मनीष माळी, प्रमोद तांबडकर, मनोज लक्ष्मण कमाने, प्रवीण बैकर, नथुराम माळी सदस्य उपस्थित होते.

# पोलिसांच्या सन्मानाने पत्रकार भारावले

**। रसायनी । वार्ताहर ।**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केलेल्या अनोख्या सन्मानाने पत्रकार भारावून गेल्याचे चित्र बघून, पत्रकारांच्या मनात आदराची भावना निर्माण झाली आहे.



आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे मराठी भाषेतील आद्य पत्रकार आहेत. त्यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले होते. जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने दर्पण हे वर्तमानपत्र मराठी भाषेत काढून इंग्रज सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्यात यासाठी दर्पणमध्येच एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात होता. महाराष्ट्र राज्य सरकारने ६ जानेवारी हा दिवस मराठी पत्रकार दिन साजरा करण्याचे घोषित केले. पत्रकार दिनाचे औचित्य साधून खालापूर तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केला. यावेळी महिला पोलीस हवालदार कीर्ती कांबळे आणि चंदा गायकवाड यांनी सर्व पत्रकार यांचे पंचारती करून औक्षण केले आणि भेटवस्तू दिली. या अनोख्या सन्मानाने पत्रकार भारावून गेले. खालापूर पोलीस ठाण्याकडून पत्रकारांना नेहमी सहकार्य केले जाईल, आपणही आम्हाला सहकार्य करावे, अशी अपेक्षा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी व्यक्त केली. यावेळी स.पो. निरीक्षक संतोष औटी, पत्रकार बाबू पोटे, प्रशांत गोपाळे, फिरोझ पिंजारी, विकी भालेराव यांनीही मनोगत व्यक्त केले. महिला उपनिरीक्षक सरिता मनवर उपस्थित होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे, खालापूर तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचा सत्कार केला. पत्रकार अर्जुन कदम यांनी सन्मान सोहळ्याबद्दल सर्व पत्रकार यांच्या वतीने आभार व्यक्त केले.

# उद्योजक विजय मेथा, पत्रकार हाजिते यांना कुलाबा जीवन गौरव

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील उद्योजक तथा तालुका पत्रकार संघाचे मार्गदर्शक खेमचंद (विजयशेठ) चुनीलाल मेथा यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल, तर पत्रकार तथा तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष मजिद इस्माईल हाजिते यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व. माजी आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने विधान परिषदेचे आ. भाई जगताप, आ. हेमंत ओगले, माजी आ. रवींद्र धंगेकर, ॲड. उमेश ठाकूर आदी मान्यवरांच्या हस्ते शुक्रवारी (दि.३) सायंकाळी मु. सातिर्जे, ता. अलिबाग या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंती निमित्त सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, वैद्यकीय, सांस्कृतिक तसेच पत्रकारिता या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा दरवर्षी माजी आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. या कार्यक्रमात ॲड. उमेश ठाकूर यांचा वाढदिवस दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जल्लोषात साजरा करण्यात आला. यंदा या पुरस्कार सोहळ्याचे हे पंधरावे वर्षे होते. माणगाव येथील उद्योजक विजय मेथा यांचा सामाजिक कार्यातील योगदान विचारात घेऊन, तर पत्रकार मजिद हाजिते यांचा पत्रकारिता क्षेत्रातील योगदान विचारात घेऊन त्यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास प्रदेश काँग्रेस सचिव ॲड. प्रवीण ठाकूर, राजाभाऊ ठाकूर, ठाकूर कुटुंबीय, महिला पायलट प्राप्ती ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते आरिफ बामणे, सुनील थळे, तोडणकर गुरुजी आदी मान्यवरांसह पुरस्कार्थी, नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. विजयशेठ मेथा व मजिद हाजिते यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पान १ वरून

## ..तर रेवस-रेड्डीला विरोध

यांनी सदर घटनेची माहिती घेण्यासाठी उरण तहसील कार्यालयात संबंधित खात्याचे अधिकारी, शेतकरी यांच्यात मंगळवारी (दि. ७) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला उपविभागीय अधिकारी अधिकारी पवन चांडक, एमएसआरडीसीचे श्री. बोराडे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नरेश पवार आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी चाणजे ग्रामपंचायत सरपंच अजय म्हात्रे, माजी सभापती ॲड. सागर कडू, माजी जि.प. सदस्य सीताराम नाखवा, करंजा ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष कल्पेश थळी, उपाध्यक्ष देवीदास थळी, मेघनाथ थळी, मुळेखंड कोंढरी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या बैठकीत द्रोणागिरी पर्वत परिसरातून जाणाऱ्या मार्गाला सदर ग्रामस्थांनीही आपला कडाडून विरोध दर्शविला. त्यामुळे सागरी महामार्गाचे काम रखडते की काय, अशी चर्चा सध्या सुरू झाली आहे.

## दिल्ली विधानसभेचे बिगुल वाजले

जबरदस्त विजय मिळवला होता. या निवडणुकीत आपने ७० पैकी ६२ जागांवर विजय मिळाला होता. तर भाजपला अवघ्या ८ जागांवर विजय मिळाला होता. गेल्या दोन विधानसभा निवडणुकांमध्ये 'आप'ने दिल्लीत वर्चस्व राखले होते. दिल्लीत बहुमतासाठी ३६ ही मॅजिक फिगर आहे. मात्र, गेल्या पाच वर्षांमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मनिष सिसोदिया यांच्यासह आपच्या प्रमुख नेत्यांवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे पक्षाची प्रतिमा काही प्रमाणात डळमळीत झाली आहे. याशिवाय, सलग १० वर्षे सत्तेत असल्यामुळे सत्ताधारी आपविरोधात अँटी-इन्कम्बन्सी फॅक्टर निर्माण झाल्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत काय घडणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

## न्याय्य हक्कासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

सक्तीच्या भूसंपादनाद्वारे संपादित करण्यात आल्या. याविरोधात शेतकरी पेटून उठलेत. आमच्या शेतजमिनीला योग्य मोबदला मिळावा, स्थानिक भूमीपुत्र शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार यांना रोजगार मिळावा, योग्य ते पुनर्वसन करण्यात यावे, तसेच साडेबारा टक्के भूखंड देण्यात यावा, या प्रमुख मागण्या घेऊन शेतकऱ्यांनी आंदोलनात्मक लढा उभारलाय. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत प्रकल्पाला विरोध असल्याचा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला आहे. हुकूमशाही पद्धतीने आमच्यावर प्रकल्प लादला किंवा आमच्या घरांवर बुलडोझर फिरवला तर आम्ही सामूहिक आत्मदहन करू, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

यावेळी मोठ्या संख्येने जमलेल्या शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात हल्लाबोल केला. तर जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, शेतकऱ्यांच्या एकजुटीचा विजय असो, आमचाच खोसा आमचाच मासा, एमआयडीसी आलाच कसा? या घोषणांनी परीसर दणाणून निघाला.

माजी ग्रामपंचायत सदस्य चेतन पाटील म्हणाले की, रायगडची भूमी ऐतिहासिक व लढाऊ आहे, आम्ही अन्याय मुळीच सहन करणार नाही, जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही लढत राहू, वेळ पडल्यास उग्र जनआंदोलन छेडू, असा इशारा दिला.

माजी सरपंच भानुदास पाटील म्हणाले की २००७ पासून शेतकरी भूमीपुत्रांनी आपल्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन सुरू केलं आहे. देशात राज्यात कायद्याचे राज्य असल्याचं सत्ताधारी म्हणतात, पण इथं हे कायदे पायदळी तुडवले जातात. प्राधिकरणात भूसंपादनाचे कायदे शासनाने करून शासनच हे कायदे मोडून काढत आहे. ३२/२ च्या नोटिसांवर शेतकऱ्यांनी हरकती दिल्या, त्यावर जाहीर जनसुनावणी झाली नाही. शेतकऱ्यांना अटक करून पोलीस बळाचा वापर करून संयुक्त मोजणी केली हे अतिशय जुलमी आहे.

स्थानिक रहिवासी, शेतकरी श्रावण पाटील म्हणाले की, आमची इथे २२ घरे आहेत, आमचं पुनर्वसन झाले नाही तर आम्ही जाणार कुठं? आमचं पुनर्वसन झाले नाही तर आम्ही सामूहिक आत्मदहन करू, याकडे सरकारने वेळीच लक्ष द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

शेतकरी महिला मधुरा भास्कर पाटील म्हणाल्या की, आमची शेती आम्ही देतोय तर त्याबदल्यात आम्हाला रास्त भाव मिळाला पाहिजे, आमच्या मुलांना नोकरीसाठी बाहेरगावी जायची वेळ नको, तर त्यांना प्रकल्पात नोकऱ्या मिळाव्यात व भूखंडदेखील मिळावा.

आम्ही वारंवार शासन प्रशासनाला वारंवार निवेदने देऊन आम्ही शेतकरी आमची भूमिका व मागणी मांडत आहोत. मात्र, निवेदनाची कोणतीही दखल न घेता भूसंपादनाची ३२/२ ची नोटीस लावली आहे. येथील शेतकऱ्यांना विश्वासात न घेता बळजबरीने भूसंपादन सुरू आहे, याला आमचा विरोध आहे. आमचा प्रकल्पाला विरोध नाही. मात्र, आमच्या जमिनीला योग्य तो भाव मिळावा, आमचे पुनर्वसन करण्यात यावे, तसेच प्रकल्पग्रस्त शेतकरी व इतर कुटुंबालादेखील नोकऱ्या मिळाव्यात, अन्यथा आम्ही प्रकल्प होऊ देणार नाही.

**- राजाराम पाटील, अध्यक्ष, धाकटे शहापूर**

## आरोग्य सेवेच्या ढिसाळ कारभाराविरोधात मूक मोर्चा

ट्रॉमा सेंटर उभे केले. हे रुग्णालय उभे झाल्यापासूनच या ठिकाणी योग्य उपचारांची आणि डॉक्टरांची वानवा आहे. या ठिकाणी इतर सुविधादेखील उपलब्ध नसल्याने रुग्णांना शहरांमध्ये पैसे खर्च करून उपचार करून घ्यावे लागत आहेत. तर अनेक वेळा मुंबईसारख्या ठिकाणी पदरमोड करत उपचारासाठी जावे लागत आहे. पोलादपूरपासून माणगावपर्यंत मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये जखमींना आणल्यानंतर अधिक उपचाराकरिता मुंबईसारख्या ठिकाणी नेण्याचा सल्ला देण्यात येतो. महाडपासून मुंबईला जाण्यासाठी सुमारे चार तासांचा प्रवास करावा लागतो. यादरम्यान योग्य उपचार मिळाल्यास रुग्ण बचावू शकतो. अपघातामध्ये अनेक रुग्ण या ठिकाणी उपचार न मिळाल्यामुळे मुंबईमध्ये स्थलांतर करत असतानाच दगावले आहेत. काही दिवसांपूर्वी वीर रेल्वे स्थानकासमोर झालेल्या भीषण अपघातात सहा जण गंभीर जखमी झाले होते. यातील दोन जण जागीच ठार झाले, तर उर्वरित जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले. मात्र, अधिक उपचाराकरिता मुंबईमध्ये हलवण्याचा सल्ला दिला आणि यादरम्यान हे जखमी दगावल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. याबाबतीत मंगळवारी (दि. ७) महाडमधील काही नागरिकांनी महाड ग्रामीण रुग्णालयाच्या गलथान कारभाराविरोधात मूक मोर्चा काढण्यात आला.

शहरातून हा मोर्चा महाड उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयावर घेण्यात आला. या ठिकाणी नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला. ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर नसल्याने आणि इतर सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांचे रुग्णांचे हाल होत आहेत, याबाबत शासनाने ठोस पावले उचलली नाहीत तर महाडकर नागरिक यापुढे तीव्र आंदोलन करतील, असा इशारा यावेळी देण्यात आला.

## पितापुत्राला मारहाण, आरोपींना पिझ्झा बर्गर?

हकीकत अशी की, चौल-भाटगल्ली येथे अरुण घरत यांचे सिमेंट व अन्य मटेरियल सप्लायर्सचे दुकान आहे. त्यांचा मुलगा सुयोग सकाळी साडेदहाच्या सुमारास चौल-सागमळा येथे सिमेंटच्या गोणी टेम्पोतून (एमएच ०६ एजी ७००९) घेऊन जात होता. त्याचा टेम्पो सागमळा एस नाईक आळी येथे आला असता, रेवदंडा बाजूकडून अलिबाकडे जात असलेल्या मागून येणाऱ्या नाशिक पंचवटी येथील पर्यटकांच्या गाडीने टेम्पोला जोरदार ठोकर दिली. सदर गाडी (एमएच १५ एफएन २३४०) दीपाली स्वप्नील वानखेडे या चालवत असल्याचा दावा सुयोग घरत याने केला आहे. गाडीतील महिला चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. यामध्ये त्यांच्या गाडीचे नुकसान झाले. स्वतःच्या चुकीने अपघात झाला असतानाही पर्यटक माझ्यावर अरेरावी करु लागले. गाडीत बसलेल्या अन्य लोकांनी मला मारहाण केली. मी तात्काळ वडील अरुण घरत यांना घटनास्थळी बोलावले. ते येताच पर्यटक महिला आणि पुरुषांनी काहीही ऐकून न घेता आम्हा दोघांना हाताबुक्क्यांनी जोरदार मारहाण केली, असा आरोपही सुयोग घरत याने केला आहे. या मारहाणीत अरुण घरत जखमी झाले असून, त्यांना तात्काळ रेवदंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ दाखल करण्यात आले. या मारहाणीत वडिलांची सोन्याची चैन गहाळ झाल्याची माहिती सुयोगने दिली.

दरम्यान, हा अपघात घडल्यानंतर मोठ्या प्रमाणात सागमळा येथे वाहतूक कोंडी झाली होती. रेवदंडा पोलिसांना तात्काळ हस्तक्षेप करीत वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर दोन्ही गटातील लोकांना पोलीस ठाण्यात हजर केले. पर्यटकांना राजकीय वरदहस्त असल्याने त्यांच्यासाठी मंत्रालयातून फोन करुन पोलिसांवर दबाव टाकण्यात आल्याने पोलीस गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करीत होते, असा आरोप घरत पितापुत्राकडून करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे दुपारी बाराच्या दरम्यान घटना घडल्यानंतर पोलीस ठाण्यात जवळपास रात्री दहा वाजताच्या दरम्यान गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यानच्या काळात पोलिसांकडून घरत आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर व्यक्तींना अरेरावीची भाषा वापरुन पर्यटकांना गोंजारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात येत आहे. परंतु, पोलिसांनी हे सर्व आरोप फेटाळले असून, दोन्ही बाजूच्या लोकांना परस्परात सामंजस्यातून वाद मिटवण्याचे आवाहन केल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, पोलिसांनी पर्यटकांना पिझ्झा बर्गर आणून देण्याची परवानगी दिलीच कशी, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. पोलिसांकडून सामान्य आरोपींना अशी वागणूक कधी दिली जाते का? पिझ्झा बर्गर पोलीस ठाण्यात आणले जात असताना बघ्याची भूमिका घेणाऱ्या रेवदंडा पोलिसांच्या कार्यप्रणालीवर संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल महेंद्र राठोड करीत आहेत.

**आरोपींवर गुन्हा**

एमएच १५ एफएन २३४०, एमएच १५ एचयू ५५६५ आणि एमएच १५ जेडी ००५४ या कारमध्ये आलेल्या कुणाल त्रंबक पाटील, स्वप्नील धोंडीराम पाटील, चंद्रकांत रामदास पाटील, ललीत रामदास पाटील, दिपाली स्वप्नील वानखेडे, कांचन ललीत पाटील, वैष्णवी महेंद्र देसले, वैशाली कुणाल पाटील, शीतल राकेश खैरनार सर्व रा. पंचवटी, नाशिक येथील पर्यटकांनी मारहाण केल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public by and large that we are instructed by our client, **M/s. BALAJI VISHWAKARMA ASSOCIATES** to investigate their Ownership rights, title, interest and benefits with respect to the Non-agricultural land bearing Gat No. 27, Hissa No. 3, area admeasuring about 1200.00 Sq. Mtrs., lying, being and situated at Village Chendhare, Taluka Alibag, District - Raigad **("Said Plot")**.

**ALL PERSONS** having any claim to or any share, right, title and interest against or to the said Plot by way of sale, transfer, assignment, mortgage, lien, lease, trust, gift, charge, easement possession, inheritance, maintenance or otherwise howsoever are hereby required to make the same known to the undersigned in writing, at our office address mentioned below within 15 days from the date of publication hereof, alongwith documentary proof in support of such claim, failing which we shall certify the Ownership rights of **M/s. BALAJI VISHWAKARMA ASSOCIATES** with respect to the Non-agricultural land bearing Gat No. 27, Hissa No. 3, area admeasuring about 1200.00 Sq. Mtrs., lying, being and situated at Village Chendhare, Taluka Alibag, District - Raigad without having any reference to such claim, if any, and the same shall be deemed/considered to have been waived and/or given up.

**THE SAID PLOT/PROJECT LAND ABOVE REFERRED TO:**

ALL THAT piece and parcel of Non-agricultural land bearing Gat No. 27, Hissa No. 3, area admeasuring about 1200.00 Sq. Mtrs., lying, being and situated at Village Chendhare, Taluka Alibag, District - Raigad

**Dated this 8th January, 2025**

Sd/-
Adv. Parth Chande
KC & Partners,
1202, 12th Floor, The Landmark,
Plot No - 26A, Sector 7, Kharghar,
Navi Mumbai, Maharashtra 410210

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे पोटलज बुद्रुक, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. लालचंद गणपत भुरे<br>रा.पोटलज बु.,ता.सुधागड, जि.रायगड. | १९ | ०-७९-९० | १४-१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :-०८/०१/२०२५
खरेदी घेणार श्री. विश्वनाथ शंकर पाटील.
रा. डायघर, १९७६/६, कल्याण फाटा,
पडले, ठाणे. ४२१२०४

खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील सौ. स्नेहा पंकज शिर्के, सौ. स्नेहल प्रितीज हले, कु. श्वेता चंद्रनाथ रामजी यांना खाली वर्णन केलेली जमीन सदर मिळकतीचे मालक श्री. अनिस अहमद राऊत यांच्याकडून विकत घेण्याची आहे. सदर मिळकत मौजे बोर्ली, तालुका मुरूड, जिल्हा रायगड येथे आहे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मुरूड | ६२/१ | १-०३-००<br>पैकी श्री. अनिस अहमद राऊत यांच्या मालकीची<br>०-१८-५०<br>पो.ख. ०-३०-००<br>एकूण ०-४८-५०<br>यापैकी ०-०५-१० | ०-७५<br><br>०-१९<br>भोगवटादार वर्ग-१,<br>खाते क्र.१०३ |

पूर्वेस : गट नं.६२/२ मधील श्री. अनिस अहमद राऊत यांच्या मालकीची शिल्लक राहिलेली मिळकत.
पश्चिमेस : गट नं.६२/२ मधील श्री. अनिस अहमद राऊत यांच्या मालकीची शिल्लक राहिलेली मिळकत.
उत्तरेस : मुख्य रस्त्यापासून बोर्ली गांवात जाण्याकरीता सोडलेला याच जागेतील रस्ता.
दक्षिणेस : श्री. वेसावकर यांची मिळकत.

सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कसल्याही प्रकारचे करारपत्र वगैरे दस्तांच्या आधारे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांच्याकडे दाखल करावी. उक्त मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास आमचे अशील सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून सदर मिळकत खरेदी करतील व मागाहून कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०७-०१-२०२५

**(ॲड. विकास हरिश्चंद्र पाटील)**
"युगंधर सोसा". शॉप नं. ०६,
युनियन बँकेशेजारी, ब्राम्हण आळी,
अलिबाग, जिल्हा-रायगड.
मो- ७७९८८४४४३३

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.२०३/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. राम सखाराम पाष्टे
वयः६० वर्षे, धंदा शेती,
कायमचा पत्ता मु. मूर
ता. माणगांव, जि. रायगड.
सध्याचा पत्ता : गणेश मंदिर जवळ, — अर्जदार
जय शंकर चाळ नं. २/५,
गणेश नगर दिवा आगासन रोड,
दिवा, ठाणे महाराष्ट्र - ४००६१२

विरूद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देवळी, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. राम सखाराम पाष्टे यांचे वडील कै. सखाराम गोपाळ पाष्टे हे दि. ०४/०६/१९७४ रोजी मौजे मूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मृत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ७१/२०२४ ने दि. २२/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे वडील कै. सखाराम गोपाळ पाष्टे हे दि.०४/०६/१९७४ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.
विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. राम सखाराम पाष्टे यांचे वडील कै. सखाराम गोपाळ पाष्टे हे दि. ०४/०६/१९७४ रोजी मौजे मूर, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता.: ०६/०१/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.२०१/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री.नथुराम बाळाराम पालकर
वय : ५० वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. जावळी,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत लोणशी,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो., — सामनेवाला
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. नथुराम बाळाराम पालकर यांची आई कै. रुक्मिनी बाळाराम पालकर ही दि. १५/०९/२००० रोजी मौजे जावळी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०६/०१/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै. रूक्मिनी बाळाराम पालकर ही दि. १५/०९/२००० रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.
विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नथुराम बाळाराम पालकर यांची आई कै. रुक्मिनी बाळाराम पालकर ही दि. १५/०९/२००० रोजी मौजे जावळी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता.: ०६/०१/२०२५ — **कार्यकारी दांधिकारी माणगांव**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे खरवंडी ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील १) प्रतिक सदानंद शेट्टी व २) तेजश्री वैभव थोरात हे अनुसया सुरेश कदम आणि इतर १७ या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|
| | हे.-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| ११ | २-०९-०० गुंठ्यापैकी<br>०-४८-०० गुंठे जमीन<br>मिळकत नदीच्या बाजुची | ५ | ०६ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीज चार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
०८/०१/२०२५
मो.नं ९२८४६७७५१६

आशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदिवडे ता. कर्जत
जि. रायगड ४१०२०१

# अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले

## बलात्काराचे गुन्हे ७३ टक्के अल्पवयीन मुलींशी निगडीत

**| रायगड | प्रतिनिधी |**

**रायगड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात १०७ बलात्काराच्या घटना समोर आल्या. चिंताजनक बाब म्हणजे यातील ७४ प्रकरणे ही अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराची होती. म्हणजेच जिल्ह्यात दाखल होणाऱ्या ७३ टक्के गुन्हे हे अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराशी निगडीत आहेत. ही रायगडकरांसाठी चिंताजनक बाब आहे.**



महिलांवरील अल्पवयीन मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी देशात कठोर कायदे अस्तित्वात असले तरी अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण मात्र कमी झालेले नाही. ते निंरतर वाढत चालले असल्याचे दिसून येत आहे. मुंबई आणि ठाणे सारख्या महानगरापासून अगदी लागून असलेल्या रायगड जिल्ह्यातही याचीच प्रचिती येत आहे.

सन २०१९- २० पर्यंत रायगड जिल्ह्यात महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे सरासरी वार्षिक ५० गुन्हे दाखल होत होते. गेल्या तीन वर्षात महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांचे प्रमाण दुपटीने वाढले आहे. जिल्ह्यात वार्षिक सरासरी १०० गुन्हे दाखल होऊ लागले आहेत. यातही पॉस्को अर्थात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्या अंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे.

२०२४ मध्ये रायगड पोलीस दलाच्या हद्दीत बलात्काराची १०७ प्रकरणे, विनयभंगाची १५७ प्रकरणे दाखल झाली. बलात्काराची १०७ पैकी ७४ गुन्हे हे पॉस्को कायद्याअंतर्गतचे आहेत. म्हणजेच ही सर्व प्रकरणे अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराशी निगडीत आहेत.

**रायगड जिल्ह्यात बलात्काराचे दाखल गुन्हे**

| | |
|---|---|
| २०१९ | : ४९ |
| २०२० | : ५८ |
| २०२१ | : ५७ |
| २०२२ | : १०६ |
| २०२३ | : १०० |
| २०२४ | : १०७ |

रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या हद्दीत एकूण २८ पोलीस ठाणे आहेत. यापैकी २४ पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. अलिबाग, कर्जत, खालापूर, रसायनी, पोलादपूर, महाड, म्हसळा, वडखळ आणि गोरेगाव सारख्या ग्रामीण भागातही अशाच स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले आहेत.

बरेचदा आपली आणि कुटुंबाची बदनामी होईल या भितीने मुलीसमोर येऊन तक्रारी देत नाही. त्यामुळे दाखल झालेल्या गुन्ह्यांपेक्षा अत्याचाराचे प्रमाण जास्त असू शकते. महिला आणि अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराचे वाढलेले प्रमाण हे समाजातील वाढत्या विकृत मनोवृत्तीचे द्योतक आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांना रोखण्यासाठी तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. पोलीस कारवाई बरोबरच किशोरवयीन मुलांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे.

> “पूर्वी बदनामी होईल या भितीने पिडीत मुलगी अथवा तिचे पालक तक्रारीसाठी समोर येत नसत, आता जागृकता वाढल्याने, पिडीत मुली आणि तीचे पालक तक्रारीसाठी समोर येऊ लागले आहे. त्यामुळे दाखल गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. पण पोलीस अशा गुन्ह्याबाबत अतिशय संवेदनशील आहेत. वर्षभरात दाखल झालेल्या सर्व गुन्ह्यांचा तपास पूर्ण करून आम्ही आरोपींविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केली आहेत.”
>
> **– सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

# निवडक

## १३ जानेवारीपासून म्हसोब्याच्या यात्रेला होणार सुरूवात

**कळंब :** गुरांच्या बाजारासाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेली म्हसोबाची यात्रा १३ जानेवारीपासून सुरू होणार आहे. यात्रेसाठी चक्री, पाळणे दाखल झाले आहेत, तसेच प्रसिद्ध हातोली, जांभूळ मिठाई तयार करण्याची प्रक्रिया व्यापाऱ्यांनी सुरू केली आहे.



म्हसा गावी दरवर्षी पौष शुद्ध पौर्णिमेला ही यात्रा भरते. यात्रेत लाखोंच्या संख्येत भाविक सहभागी होतात. ठाणे, पुणे, रायगड, पालघर, नगर, बीड जिल्ह्यासह कर्नाटकमधूनही काही व्यापारी व भाविक सहभागी होतात. त्यामुळे भाविकांना म्हसा गावी जाण्यासाठी कल्याण, मुरबाड, नेरळ, कर्जत भागातून एसटीच्या यात्रा विशेष बस गाड्या सोडल्या जातात. यावर्षी कल्याण-मुरबाड मार्गावर सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करण्याचे काम सुरू आहे. म्हसा यात्रेच्या वेळी १२ जानेवारीपासूनच मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ सुरू होणार आहे.

## अनंत देवघरकर यांना दोन राज्यस्तरीय पुरस्कार

**अलिबाग :** अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई संस्थेतर्फे अक्षरमंच काव्यलेखन स्पर्धेत माजी प्राचार्य, कोमसाप अलिबाग शाखेचे माजी अध्यक्ष डोंगरे हॉल वाचनालय अलिबागचे माजी कार्यकारिणी सदस्य, ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबागचे कार्यकारिणी सदस्य आणि जनमानसात रमणारे कवी अनंत देवघरकर यांनी सलग ६० महिने काव्यलेखन केल्याने त्यांना २९ डिसेंबर २४ रोजी देहू येथे भव्य समारंभात विश्वगुरू डॉक्टर मधुसूदन घाणेकर यांच्या हस्ते शाल, पदक आणि संस्थेचा न्यायप्रभात अंक देऊन साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच भाई जगताप मित्र मंडळ रायगड, मधुकर ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, ॲड. उमेश ठाकूर मित्र मंडळ संस्थेतर्फे कवी अनंत देवघरकर यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ ने गौरवण्यात आले.अनंत देवघरकर यांनी पाच दिवसात दोन पुरस्कार प्राप्त केल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## पालिकेच्यावतीने उपजिल्हा रुग्णालयाची स्वच्छता



**पनवेल :** शहरातील महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाची आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार महापालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागाच्यावतीने सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पनवेल शहरातील महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालय हे महत्वाचे शासकीय रूग्णालय आहे. पनवेल शहर व ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी रूग्ण येत असतात. उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या निर्देशानूसार या मोहिमेंतर्गत संपुर्ण रूग्णालय आतून बाहेरून स्वच्छ धुवून काढण्यात आले.



## वृद्धाश्रमात किराणा सामानाचे वाटप

**अलिबाग :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी दिवंगत मीनाताई ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अलिबाग श्री समर्थ वृद्धाश्रम परहुर पाडा येथे ममता दिन साजरा करण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा महिला संपर्क प्रमुख किशोरी पेडणेकर तसेच अलिबाग तालुका संपर्क संघटिका चंदना साळुंके व दिक्षा गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे आणि दिपश्री पोटफोडे यांच्या उपस्थितीत श्री समर्थ वृद्धाश्रम परहुर पाडा येथे ममता दिन साजरा करण्यात आला. ममता दिन निमित्त वृद्धाना लागणाऱ्या रोजच्या छोट्या वस्तू, खाऊ, किराणा सामान भेट देण्यात आले. या कार्यक्रमासाठी विधानसभा संघटक कृष्णा कडवे व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन अलिबाग तालुका संघटिका स्नेहल देवळेकर यांनी केले. तालुका अधिकारी दर्शना वाकडे, विभाग संघटिका शिल्पा ठाकूर, निवेदिता गावंड, प्रणाली राऊत,पूनम नाईक, विभाग प्रमुख गिरीश शेळके यांनी सहकार्य केले.

# गिरणींवर भात खरेदीला प्रतिसाद

## ७८०० क्विंटल भात खरेदी ; भाताला प्रति क्विंटल २३०० रूपये

**| पनवेल | वार्ताहर |**

पनवेल तालुका सहकारी भात गिरणी केंद्रावर भात खरेदीला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ७, ८०० क्विंटल भात खरेदी झाली आहे. यावर्षी शेतकऱ्याच्या भाताला प्रति क्विंटल २,३०० रुपये दर दिला जात आहे.

पनवेल तालुक्यातील नेरे, वांगणीतर्फे वाजे, कर्नाळा, शिरढोण या विभागात भातशेती मोठ्या प्रमाणात केली जात आहे. जया, सुवर्णा आणि कोलम जातीच्या भाताची लागवड केली जाते. औद्योगिकीकरणामुळे पिकत्या जमिनी सरकारी, तसेच खासगी प्रकल्पाकरिता संपादित झाल्याने भातशेतीचे प्रमाण घटले आहे.

शहरीकरणामुळे जमिनीचे भाव वाढू लागल्याने अनेक शेतकऱ्यांचा जमीन विक्रीकडे कल वाढत आहे. दरम्यान, एकेकाळी भाताचे कोठार म्हणून पनवेलची ओळख होती.

यंदाच्या हंगामात ३१ जानेवारी २०२५ पर्यंत भात खरेदी केली जाणार असून, सर्वसाधारण २,३०० रुपये प्रति क्विंटल भाताला दर दिला जात आहे.

भात गिरणी केंद्रावर ऑनलाइन पद्धतीने नोंद करून शेतकऱ्यांकडून भात खरेदी प्रक्रिया होत असल्याची माहिती सहकारी भात गिरणी केंद्राचे चेअरमन रवींद्र पाटील यांनी दिली.

२०२३ या वर्षात तालुक्यात सुमारे २४, ३३६ क्विंटल भाताचे उत्पादन झाले होते. २०२२ मध्ये हेच उत्पन्न सुमारे ३१ हजार क्विंटल इतके होते. यावर्षी भाताचे उत्पन्न अपेक्षानुसार होईल, असे पाटील यांनी सांगितले आहे. भाताला चांगला दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी देखील आपल्या भाताची विक्री सहकारी भात गिरणींवर करण्यास सुरूवात केली आहे.

### ऑनलाइन पद्धतीने नोंदणी

**पनवेल तसेच उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी २०२२ मध्ये खरीप हंगामात २,०८८ शेतकऱ्यांनी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी केली. त्यापैकी १,६९२ शेतकऱ्यांनी ३१, ३५१.७० क्विंटल भात दिला होता. २०२३ मध्ये खरीप हंगामात १,६२९ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंद करून रजिस्टर १, ५१८ शेतकऱ्यांनी २४, ३३६. ८० क्विंटल भात दिला.**



## बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मराठी पत्रकार सृष्टीचे जनक, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र स्थापन केले होते. त्या निमित्ताने सहा जानेवारी हा दिवस सर्वत्र पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. पनवेलमधील पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादनपर कार्यक्रम झाला. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे मराठी पत्रकारितेतील योगदान मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

असोसिएशनचे आधारस्तंभ ज्येष्ठ पत्रकार दीपक महाडिक यांनी बाळशास्त्रीं जांभेकररांची पत्रकारिता ते आजची सोशल मीडियाद्वारे होणारी पत्रकारिता या पर्यंतचा प्रवास विशद केला.

## मोहोपाड्याच्या विकासासाठी ग्रामस्थ एकवटले

**| रसायनी | वार्ताहर |**

मोहोपाडा शिवनगर गावात एकोपा राहून गावाचा विकास व्हावा, यासाठी मोहोपाडा स्थानिक तरुणांनी आपली सामाजिक बांधिलकी जोपासत ग्रामस्थांना एकत्र आणून एकमेकांचे मनोमिलन केले. यासाठी नववर्षानिमित्त चर्चा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सर्व ग्रामस्थांनी राजकारण बाजूला सारुन एकत्रित राहून गावाच्या विकासाला बाधक ठरणाऱ्या अथवा ग्रामस्थांना कोणी त्रास देत असल्यास एकत्र येवून विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी ग्रामस्थांच्या चर्चेत विविध विषयांवर प्रकाश टाकण्यात आला. यात काही प्रश्नांवर त्वरीत निर्णय घेण्यात आला तर काही समस्यांवर पुन्हा चर्चेत तोडगा काढण्याचे ठरले. गावाच्या हद्दीतील जमिनीवर कोणी जागा बळकावून विक्री करणार असेल तर त्याच्यावर कारवाई करावी असे ठरले. भविष्यात मोहोपाडा गावाच्या विकासासाठी आम्ही एकजुटीने राहणार असल्याचे सर्वानुमते ठरले.यावेळी ग्रामपंचायत वार्ड सदस्य, पदाधिकारी, तरुणवर्गासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## डॉ.सी.डी.देशमुख महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर

**| कोलाड | वार्ताहर |**

रोहे येथील कोकण एकुकेशन सोसायटीच्या डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. के. जी. ताम्हणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर भागीर्थिखार येथे संपन्न झाले.

या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन भागीर्थीखार गावाचे ज्येष्ठ सामजिक कार्यकर्ते धर्माजी कोळी यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी रायगड जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा.तुळशिदास मोकल, प्रा.सीमा भोसले, प्रा. अनंत थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.



विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी ग्राम स्वछता, परिसर स्वच्छता, स्मशानभूमी परिसर स्वच्छता, विहीर परिसर स्वच्छता, वृक्षारोपण, मंदीर परिसर रस्ता निर्मिती, बाग परिसर स्वच्छता आदी महत्वपूर्ण कामे केली.

या शिबीराच्या बौध्दीक सत्रात प्रा. तुळशिदास मोकल यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांचे योगदान, पत्रकार महादेव सररसंबे यांचे पत्रकारिता समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम, प्रसाद दगडे व सायली भगत यांचे सेंद्रीय शेती स्वरुप व व्यवस्थापन, सुशील रुळेकर यांचे सेंद्रीय खत निर्मिती व किटकनाशक वापर प्रक्रिया, जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी संजय माने यांचे एच. आय. व्ही एड्स मार्गदर्शन व समुपदेशन, डॉ. सुकुमार पाटील यांचे व्यक्तिमत्त्व विकास,जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक रायगड जिल्हा परिषद जयवंत गायकवाड यांचे स्वच्छतेतील युवकांचे योगदान यांची व्याख्याने झाली.

या विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी स्त्रीभ्रूण हत्या, जलसाक्षरता, एड्स नियंत्रण जनजागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, स्वच्छता अभियान आदी विषयांवर पथनाट्य सादर करून जनजागृती कार्यात महत्त्वपूर्ण हातभार लावला.

या शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी प्रार्थना, कवायत, योग, शिस्त, संस्कार व सामजिक बांधिलकीचे धडे घेतले.

या शिबीराचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली व कोएसो मेहंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय संकुलाचे चेअरमन संदीप गांगल, नितिन जोशी, धर्माजी कोळी, यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला.

## नेरे येथे महाआरोग्य शिबीर

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

सीमा तांबोळी यांच्या वाढदिवसानिमित्ताने सुरज हॉस्पिटल, सानपाडा आणि नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था, नेरे यांच्या संयुक्त विद्यमाने नेरे येथे महाआरोग्य शिबीर, उपचार व मोफत औषधे वाटपाचे आयोजन नेरे येथे करण्यात आले होते.या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.



यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, शेकापचे पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, गोपाळ भगत, विलास फडके, दर्शन ठाकूर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

यावेळी शिबिरात आलेल्या नागरिकांची मेंदूचे आजार, मणक्याचे आजार, मानसिक विकार, हृदयविकार, ऑर्थोपेडिक शिबिरातील तपासणी, एक्स-रे, मधुमेह, ब्लड प्रेशर तपासणी, एक्सरे, इसीजी, डोळे तपासणी करण्यात आली. तसेच त्यांना औषधे वाटपदेखील करण्यात आली. अशा प्रकारचे आरोग्य शिबीर राबवून नागरिकांची सेवा करत असल्याचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले.

## राज्यातील शाळांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन सप्ताह

**| रायगड | प्रतिनिधी |**

राज्यातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन सप्ताह साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने १४ ते २१ जानेवारी या कालावधीत उद्योग-व्यवसाय क्षेत्र भेट, माजी विद्यार्थी मार्गदर्शन सत्र, करिअर मार्गदर्शन असे उपक्रम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे (एससीईआरटी) संचालक राहुल रेखावार यांनी याबाबतच्या सूचना जिल्हा परिषदांचे माध्यमिक शिक्षणाधिकारी, महापालिकांचे प्रशासन अधिकारी यांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. नववी ते बारावीचे वर्ग असलेल्या सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये १४ जानेवारी हा दिवस व्यवसाय मार्गदर्शन दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

यंदा हा उपक्रम सप्ताहाच्या माध्यमातून साजरा करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार उपक्रम राबवण्याचे वेळापत्रकही निश्चित करण्यात आले आहे.

विविध करिअर क्षेत्रांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन १४ जानेवारी रोजी, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम गिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे सत्र १५ जानेवारी रोजी, व्यवसायाचा मंत्र या विषयावर यशस्वी व्यावसायिकांचे मार्गदर्शन १६ जानेवारी रोजी, एससीईआरटीच्या वेबिनार मालिकेचे प्रसारण १७ जानेवारी रोजी, शाळेनजीकचे उद्योग, कारखाने येथे भेट आयोजित करून भेटीसंदर्भातील अहवाल लेखन १८ जानेवारी रोजी, नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विद्यार्थ्यांची आवड, त्यांची क्षमता आणि उपलब्ध करिअर याबाबत मार्गदर्शन १९ जानेवारीरोजी,दहावी-बारावीच्याविद्यार्थ्यांच्यापरीक्षांच्या पार्श्वभूमीवर मानसशास्त्र तज्ज्ञांचे परीक्षा आणि ताणतणाव निवारण विषयावर मार्गदर्शन २१ जानेवारी रोजी आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

## शिवप्रेमींनी केला परिसर स्वच्छ | राजपुरोहितांकडून गड देवतांचे विधीवत पूजन

# पद्मदुर्गावर अवतरली शिवशाही

**| मुरूड | वार्ताहर |**

शेकडो शिवप्रेमींच्या सहभागाने रविवारी पद्मदुर्ग जागर सोहळा उत्साहात संपन्न झाला. मुरूड येथील गड संवर्धन संस्था व कोकण कडा मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सकाळीच किल्ल्यावर दाखल होत शिवप्रेमींनी परिसर स्वच्छ केला. त्यानंतर गडावर फुलांची सजावट करण्यात आली. तोरण लावण्यात आले. ठिकठिकाणी भगवे झेंडे लावण्यात आले. त्यामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते. त्यानंतर राजपुरोहितांकडून गड देवतांचे पूजन करण्यात आले.



यावेळी पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकूर, कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, पुरोहित प्रकाश जंगम, कोकण कडा मित्र मंडळ सदस्य शेखर फरमन, राहुल कासार, संकेत वडके, विजय वाणी, प्रदीप बागडे, महेंद्र मोहिते, मुरूड बंदर निरीक्षक प्रमोद राऊळ, आकाश मुळेकर आदींसह शिवप्रेमी उपस्थित होते. राजपुरोहित प्रकाश स्वामी जंगम यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन केले, तसेच शिवप्रेमी विजय वाणी यांनी सपत्निक शिवप्रतिमेला मुद्रांचा अभिषेक केला.

### गड संवर्धनासाठी निधीची गरज

**शिवकालीन शौर्याचे खेळ, दांडपट्टा, तलवारबाजी, मल्लखांब, पारंपरिक गोंधळ आदीचे शिवप्रेमींनी सादरीकरण केले. सोहळ्यात महाड, मुरूड शहरासह पंचक्रोशीतील शिवप्रेमी सहभागी झाले होते. जंजिरा किल्ल्यावर गंजलेल्या तोफा व तटबंदीवरील चिऱ्यांवर रसायनिक मिश्रण वापरून डागडुजी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पद्मदुर्ग किल्ल्याचे संवर्धन व्हावे, त्यासाठी निधी उपलब्ध व्हावा, अशी मागणी आशिलकुमार ठाकूर यांनी केली आहे.**

### पुस्तकांतून इतिहासाचा मागोवा

**मरूत्क्षेत्र ते मुरूड इतिहासाचा पुरातत्त्वीय मागोवा आणि श्री शिवछत्रपतींचा पद्मदुर्ग या इतिहास उलगडणाऱ्या दोन पुस्तकांचे प्रकाशन मुरूड नगर परिषदेच्या शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आले. मुरूड येथील पुरातत्त्व अभ्यासक प्रीतम वाळंज हिने मरूत्क्षेत्र ते मुरूड इतिहासाचा मागोवा या नावाने, तर मुरूडचेच इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील यांनी श्री शिवछत्रपतींचा पद्मदुर्ग हे पुस्तक लिहिले आहे.**

## पनवेल तालुक्यात २१ हजार जनावरांचे लसीकरण

**| पनवेल | वार्ताहर |**

एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या नऊ महिन्यात पनवेल तालुक्यातील २१ हजार १३३ जनावरांचे लसीकरण करण्यात आले आहे. यात गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्या, कुत्रे, डुक्कर, कोंबडी यांचा समावेश आहे.

तालुक्यात गाय व म्हैस वर्ग यातील मोठ्या जनावरांपैकी १ हजार २० जनावरांना घटसर्प आणि फऱ्याचे लसीकरण करण्यात आले. २ हजार ६०० जनावरांना घटसर्पाची लस दिली. ४ हजार ५९१ जनावरांना लंपी तर दहा हजार ३८० जनावरांना लाळ्या खुरकूत देण्यात आले. ५० थायलेरेसिस, ९० अँटी रेबीज तर १६० ब्रूसेलोसिस देण्यात आले. २ हजार शेळ्या आणि मेंढ्या यांना ईटीव्हीचे लसीकरण तर ४७२ कुत्र्यांना अँटीरेबीजचे इंजेक्शन देण्यात आले. ५० डुक्करांना स्वाईन फेवर आणि पंधराशे कोंबड्यांना फॉलपॉक्स आणि रँनीखेत देण्यात आले. डिसेंबर २०२४ पासून तालुक्यात पशुगणनादेखील सुरू करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यातील १५५ गावे आणि पनवेल महानगरपालिका हद्दीतील २० गावे अशी एकूण १७५ गावांमध्ये पशुगणना सुरू करण्यात आली आहे.

# अधांतरी दरबार

निवडणुका होऊन तीन महिनेही झाले नाहीत तोवर, 'देवेंद्र, अजब तुझे सरकार,' असे म्हणण्याची वेळ आली आहे. अजून काही मंत्र्यांनी कारभाराची सूत्रेदेखील घेतलेली नाहीत. तोवरच एका मंत्र्याची विकेट काढण्याचा कार्यक्रम चालू झाला आहे. कहर म्हणजे यामध्ये खुद्द सत्ताधारी पक्षाचेच आमदार अधिक आघाडीवर आहेत. देवेंद्र आणि त्यांचे दोन-दोन डेप्युटी काही झालेच नाही अशा चेहऱ्याने हिंडत आहेत. अजितदादा तर इतके दिवस निवांत परदेशात होते. म्हणजे विरोधक इकडे जोरजोरात मोर्चे काढत होते आणि भाषणे ठोकत होते. पण दादा ते काहीही अंगाला लावून घेत नव्हते. आता ते महाराष्ट्रात आले असले तरी स्थितीत फरक पडलेला नाही. बीडचे संतोष देशमुख हत्या प्रकरण भीषणच आहे. यातले तपशील पाहता वाल्मिक कराडचा यात थेट हात दिसतो आणि वाल्मिक हा धनंजय मुंडेंचा कारभारी होता. त्यांचे सगळे धंदे वाल्मिकच सांभाळत होता. त्यामुळेच वाल्मिकचा व आपला काहीही संबंध नाही असे राजकीय चतुराईचे स्पष्टीकरण देणे मुंडे यांना शक्य नाही. त्याऐवजी जो दोषी असेल त्याला शिक्षा व्हावी इतकीच भूमिका ते मांडत आहेत. याचाच अर्थ वाल्मिकचा दोष सिध्द होणे अशक्य आहे अशी खात्री त्यांना वाटत असावी. वाल्मिक कोणत्याही टप्प्यावर आपले नाव घेणार नाही हेही त्यांना नक्की ठाऊक असावे. त्यामुळे ते काहीसे निर्धास्तपणे वावरत आहेत. मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची शक्यता त्यांनी फेटाळून लावली आहे. वास्तविक इतक्या गंभीर गुन्ह्यात आपल्या एखाद्या मंत्र्याचे नाव आल्यावर फडणवीसांनी व दादांनी स्वतःहून त्यांना दूर करायला हवे होते. चौकशी निःपक्ष होते आहे हे दाखवण्यासाठी ते आवश्यक होते. पण सध्याच्या राजकारणात इतपत नैतिकतेची अपेक्षा करणे हेच मूर्खपणाचे व भाबडे ठरू लागले आहे. मुंडे यांच्यावर लग्नबाह्य संबंधांवरून पूर्वी आरोप झाले तेही गंभीरच होते. तरी त्याहीवेळी तत्कालीन एकसंध राष्ट्रवादी पक्षाने त्यांचा बचाव केला होता. आता अजितदादांनी आपल्या मित्राला संरक्षक कवच दिले आहे.

### देवेंद्रांवर अविश्वास

मंत्री सहकाऱ्यांवर आरोप झाले तरी कोणत्याही स्थितीत कारवाई करायची नाही हे नरेंद्र मोदींचे धोरण आहे. झुकेगा नही हेच त्यांचे ब्रीद आहे. राज्याराज्यांमध्ये सर्व भाजपवाल्यांनी त्याचे पालन केले आहे. मुंडे यांचा राजीनामा घेऊन देवेंद्रांना एका दगडात अजितदादा, पंकजा आणि इतरही काही पक्षी मारता येतील. पण ते राजकारण ते नंतर कधीही करू शकतील. आता कोणत्याही स्थितीत लोकांच्या दबावापुढे आपण झुकलो असे दिसता कामा नये असे धोरण दिसते. विरोधक दुबळे असल्याने तेही एका मर्यादेपलिकडे ओरडू शकत नाहीत. पण यातला कमालीचा भाग असा की, भाजपचे बीडमधले आमदार सुरेश धस हे मुंडे-विरोधी आंदोलनाचे नेते आहेत. काल त्यांनी अंबादास दानवे वगैरे नेत्यांसोबत जाऊन राज्यपालांची भेट घेतली व मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. आता मुंडे यांना काढा अशी सूचना राज्यपालांनीच देवेंद्रांना करावी असे धस यांचे म्हणणे दिसते. देवेंद्र व त्यांच्या सरकारचा कारभार अन्याय्य व बेकायदा रीतीने चालू आहे असाही त्याचा अर्थ होतो. एका अर्थाने धस यांनी देवेंद्रांवर मांडलेला अविश्वास प्रस्ताव आहे. भाजप नावाच्या शिस्तशीर पक्षाचा एक महत्वाचा आमदार (जो पूर्वी मंत्री राहिलेला आहे) तो स्वतःच्याच मुख्यमंत्र्यावर असा अविश्वास दर्शवतो ही टोकाची निर्नायकी म्हणायला हवी. हे सर्व देवेंद्रांच्या व भाजपच्या इशाऱ्यावरूनच चाललेले आहे असाही एक तर्क यात मांडता येईल. तसे असेल तर ही आणखीनच भयंकर निर्नायकी म्हणावी लागेल. मंत्रिमंडळातील एका मंत्र्याला सरळपणे हाकलून देण्याऐवजी आपल्याच पक्षातील लोकांना त्याच्याविरुध्द बोंब ठोकायला लावायची आणि होता होईल तितके त्याला व त्याच्या पक्षाला बदनाम करून घ्यायचे असा या धोरणाचा अर्थ होतो. तीनचतुर्थांश बहुमत मिळाल्यामुळे आपण काहीही केले तरी जनता व विरोधी पक्ष आपल्याला काहीही करू शकत नाहीत अशा माजामधूनच असे धोरण आखले जाऊ शकते. यामुळे देवेंद्रांना व भाजपला किती राजकीय फायदा होईल हे पाहावे लागेल. पण महाराष्ट्र नावाच्या कथित प्रगत राज्याचे मात्र पुरते धिंडवडे निघत आहेत.

### राजकीय हिशेब

अर्थात, भाजप व अजितदादा गटासारख्या पक्षांनी महाराष्ट्राच्या अब्रूची काळजी वाहणे किंवा लाज बाळगणे हे केव्हाच सोडून दिले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून काही अपेक्षा करणे व्यर्थ आहे. पण यातून जनतेने काही धडे घेण्यासारखे आहेत. संतोष देशमुख यांची हत्या महाराष्ट्रातील काही पहिलीच नाही. पूर्वी अशा हत्यांची तड लावण्यासाठी मिडिया आक्रमक होत असे व त्यामधून एखाद्या नेत्याच्या वा मंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी पुढे येत असे. यावेळी सर्वपक्षीय राजकारण्यांनी इतके दिवस हा विषय तापवून धरला आहे. जरांगे वगैरे लोकांनी याचा आपल्या मराठा राजकारणासाठी वापर सुरू केला आहे. संबंध नसताना परभणी, पुणे अशा ठिकाणी मोर्चे काढले जात आहेत. या लोकांना परभणीतील पोलिस कोठडीत मृत्यू पावलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचे प्रकरण तितकेसे महत्वाचे वाटत नाही. कारण तो दलित असतो. त्याच्या मृत्यूचे भांडवल करण्यात कोणाचाही फायदा नसतो. आता लाजेकाजेस्तव मोर्चांमध्ये व मागण्यांमध्ये त्याचा उल्लेख केला जातो. पण या मृत्यूची गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जबाबदारी स्वीकारावी असे त्यांचे माप त्यांच्या गळ्यात टाकले जात नाही. त्यामुळे लोकांच्या मरणामध्ये देखील स्वतःचे राजकीय हिशेब पाहणाऱ्यांची ही जमात आहे हे जनतेने लक्षात घ्यायला हवे. दुसरी बाब अशी की, बीडमधील पवनचक्क्यांचे शेकडो कोटींचे व्यवहार, शेतकऱ्यांवरचे अत्याचार, फसवणूक, मुंडे यांची दहशत इत्यादींबाबत आता सर्वजण जोरजोराने बोलत आहेत. गेल्या वर्षात दोन मोठ्या निवडणुका झाल्या. यांमध्ये या प्रश्नांचा उल्लेखदेखील कोणत्याही राजकारण्याने प्रचारात केला नाही. तेव्हा मराठे विरुध्द ओबीसी अशीच गणिते मांडण्यात सर्व गर्क होते. मुंडे यांच्या दहशतीचा मुद्दा इतका तीव्र होता तर मराठा आंदोलनाने त्यावर बोलायला हवे होते. त्यावरही आंदोलन उभारायला हवे होते. पण तेव्हा यातले काही झाले नव्हते. त्यामुळे राजकारणी लोक आपल्या सोईने कोणत्या विषयाला किती व कधी हवा द्यायची हे ठरवत असतात हेही ध्यानात ठेवायला हवे.

## विचार

# सुरक्षेची वाढती आव्हाने

**बांगलादेश सरकारच्या सध्याच्या भारतविरोधी पवित्र्यामुळे आधीच पाकिस्तान प्रायोजित दहशतवादाशी झगडणाऱ्या भारतासमोर आता नवे आव्हान निर्माण झाले आहे. नुकतेच बांगलादेशमधून आसाममध्ये शिरलेल्या दोन दहशतवाद्यांना अटक केल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार ते एका मोठ्या दहशतवादी मॉड्यूलचा भाग होते. भारतात दहशतवादी कारवाया करणे हा त्याचा उद्देश होता.**



**प्रा.डॉ. विजयकुमार पोटे**

जम्मू-काश्मीरमधून आपले नापाक इरादे पूर्ण करण्यात अपयशी ठरणारा पाकिस्तान आता बांगलादेश सीमेवरून भारतविरोधी कटकारस्थाने रचत आहे. आत्तापर्यंत अन्सारुल बांग्ला संघाशी संबंधित अशा दहा दहशतवाद्यांना आसाममधून अटक करण्यात आली आहे. ही संघटना 'अल कैदा'शी संबंधित असल्याचेही सांगितले जात आहे. बांगलादेशमधील शेख हसीना सरकार कमकुवत झाल्यानंतर जिहादी आणि दहशतवादी संघटनांचा प्रभाव झपाट्याने वाढत आहे. या परिस्थितीचा फायदा घेत पाकिस्तान बांगलादेशाशी संबंध मजबूत करत आहे. बांगलादेशने पाकिस्तानी सैन्याला प्रशिक्षणासाठी आमंत्रित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. पाकिस्तानने बांगलादेशला ४० हजार दारुगोळा, २००० राऊंड रणगाडा आणि ४० टन आरडीएक्स पुरवण्याचा आदेशही दिला आहे. याशिवाय पाकिस्तानच्या 'जॉइंट चीफ ऑफ स्टाफ कमिटी'चे अध्यक्ष जनरल शाहीर शमशाद मिर्झा यांनी बांगलादेशला लष्करी प्रशिक्षणाचा प्रस्ताव पाठवला. तो स्वीकारण्यात आला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील घनिष्ठ संबंधांचा फायदा घेण्यासाठी चीनही सक्रिय झाला आहे. भारताच्या चिकन नेक कॉरिडॉरवर चीनची नजर आहे. बांगलादेश आणि पाकिस्तान या दोघांनी ईशान्येतून दहशतवादी कारवाया वाढवल्या, तर चीनला भारताविरुद्ध आपले इरादे पूर्ण करण्यासाठी अधिक सुविधा मिळतील. चीनने यापूर्वीच बांगलादेशमध्ये मोठी लष्करी गुंतवणूक केली आहे. दोन डिझेल अॅटॅक पाणबुड्या, चार म ार्गदर्शित क्षेपणास्त्र फ्रिगेट्स आणि अनेक सेमी-स्टेल्थ पेट्रोलिंग क्राफ्ट प्रदान करण्याव्यतिरिक्त, शिपयार्डमध्ये लष्करी जहाजे तयार करण्यासाठी चीन बांगलादेशला मदत करत आहे. याशिवाय 'चीनने बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय) अंतर्गत दोन टक्के व्याजदराने कर्ज देऊन बांगलादेशला आर्थिक संकटात ढकलले आहे.

बांगलादेश आणि पाकिस्तानमधील वाढती जवळीक, दहशतवादाचा उदय आणि चीनची लष्करी सक्रियता यामुळे भारतासमोर सुरक्षेची नवी आव्हाने निर्माण होत आहेत. यामुळे भारताला केवळ आपल्या सीमांची सुरक्षा वाढवावी लागणार नाही, तर राजनैतिक पातळीवरही या प्रश्नांवर तोडगा काढावा लागेल. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी अलिकडेच इजिप्तची राजधानी कैरो येथे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी व्यापारी संबंध दृढ करण्यावर भर दिला. २१ डिसेंबर रोजी पाकिस्तानमधील कराची येथून दुसरे मालवाहू जहाज बांगलादेशमधील चितगाव येथे पोहोचले. एमव्ही युआन जियांग फा झान असे या जहाजाचे नाव आहे. या जहाजावर ९९७ कंटेनर भरले होते. त्यापैकी ७८० कंटेनर चितगाव बंदरात उतरवण्यात आले. पाकिस्तानातून आलेले हे दुसरे जहाज साखर, सोडा, डेनिमचे कपडे, धागा, ड्राय फिश, यूपीएस, बटाटे आणि रेडिएटर कोर यासह इतर वस्तूंनी भरलेले होते. बांगलादेशी व्यावसायिकांना भारताऐवजी पाकिस्तानमधून वस्तू आयात करण्यास भाग पाडले जात आहे. शेख हसीना यांनी पाकिस्तानमधून येणाऱ्या जहाजांची तपासणी करणे बंधनकारक केले होते; म ात्र युनूस सरकारने हा नियम काढून टाकला आहे. आता पाकिस्तानी जहाजे कोणत्याही अडथळ्याशिवाय चितगावला पोहोचतात. २००४ मध्ये चितगाव बंदरात १५०० पेट्या जप्त करण्यात आल्या होत्या. त्यात दारूगोळा होता. या खेपेमागे पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय'चा हात असल्याचे तपासात समोर आले. कथितरित्या ही खेप 'उल्फा' या प्रतिबंधित संघटनेला दिली जाणार होती. आता तर बांगलादेशम ध्ये कट्टरवादाला प्रोत्साहन देऊन पाकिस्तान भारताला लक्ष्य करू शकतो, अशी भीती वाढत आहे.

बांगलादेशची निर्मिती करण्यासाठी १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानमधून ज्या पाकिस्तानी सैन्याला हुसकावून लावले होते, तेच आता या देशात नव्याने आपला दर्जा प्रस्थापित करू पाहत आहे. पाकिस्तानसोबत लष्करी आणि सामरिक संबंध वाढवण्याच्या दिशेने बांगलादेशतर्फे पावले उचलण्यात आली असून त्यामुळे भारतासमोर नवीन आव्हान निर्माण होऊ शकते. बांगलादेश लष्कराला प्रशिक्षण देण्यासाठी पाक लष्कराच्या 'जॉइंट चीफ ऑफ स्टाफ कमिटी'चे अध्यक्ष जनरल साहिर शमशाद मिर्झा यांच्या नेतृत्वाखालील एक विशेष पथक फेब्रुवारी २०२५ मध्ये तेथे पोहोचणार आहे. हा कार्यक्रम एक वर्ष चालणार आहे. यानंतर पाकिस्तानी लष्कर बांगलादेशच्या सर्व दहा लष्करी कमांडमध्ये प्रशिक्षण देईल. जनरल मिर्झा यांनी नोव्हेंबरमध्ये बांगलादेशला हा प्रस्ताव पाठवला होता. बांगलादेशचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांनी तो स्वीकारला. अंतरिम सरकारने पाकिस्तानशी संबंध मजबूत करण्याचे प्रयत्न वाढवले आहेत. त्याच वेळी अंतरिम सरकारने तिथल्या पोलिसांमध्ये हिंदू व्यक्तींना न घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा सराव दर दोन वर्षांनी आयोजित केला जातो; परंतु बांगलादेश गेल्या १५ वर्षांपासून यापासून दूर होता. हसीना यांच्या कारकीर्दीत पाकबरोबर लष्करी सरावावर बंदी होती; पण आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने या सरावात सहभागी होण्याचे मान्य केलेच, पण बंगालच्या उपसागरात पाक नौदलासोबत संयुक्त सरावाची तयारीही केली. हसीना यांच्या सरकारच्या काळात बांगलादेशने पाकिस्तानशी संबंध मर्यादित केले होते. २०२२ मध्ये त्यांनी पाकिस्तानी युद्धनौका पीएनएस तैमूरला चितगाव बंदरावर नांगरण्याची परवानगी दिली नाही; परंतु सध्याच्या अंतरिम सरकारने पाकमधून चितगावला येणाऱ्या मालवाहू जहाजांना परवानगी दिली असून या मालाला तपासणीतूनही सूट दिली आहे. ढाका आणि इस्लामाबाद दरम्यान थेट उड्डाण सेवा पुन्हा सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. पाक नागरिकांसाठी व्हिसाचे नियम शिथिल करण्यात आले आहेत. बांगलादेशमधील सध्याच्या बदलांमागे पाकिस्तानची रणनीती दिसत आहे. अहवालानुसार, पाकिस्तानची गुप्तचर संस्था 'आयएसआय'ने हसीना यांचे सरकार पाडण्यात आणि अंतरिम सरकार स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पाकिस्तानसमर्थक शक्ती बांगलादेशमध्ये दीर्घकाळापासून सक्रिय आहेत. त्या आता उघडपणे समोर येत आहेत. पाकिस्तानचे हे पाऊल सामरिक दृष्टिकोनातून भारतासाठी मोठे आव्हान ठरू शकते. बांगलादेशमध्ये पाकिस्तानच्या वाढत्या उपस्थितीमुळे सिलीगुडी कॉरिडॉर (चिकन नेक) ला धोका वाढू शकतो. तो भारताला ईशान्येकडील राज्यांशी जोडणारा एकमेव मार्ग आहे. तसेच भारताच्या ईशान्य भागात कट्टरतावादी शक्ती आणखी मजबूत होण्याची शक्यता आहे. पाकिस्तान-बांगला देश युती हे भारतासाठी राजनैतिक आव्हान तर आहेच; पण सुरक्षेच्या दृष्टिकोनातूनही हा अत्यंत चिंतेचा विषय बनला आहे.

हसीना यांच्या कार्यकाळात आपल्या ईशान्येकडील सीमा आता सुरक्षित राहतील आणि या शेजारी देशाशी चांगले संबंध राहतील, असे वाटले होते; परंतु पाच ऑगस्ट २०२४ च्या बांगलादेशमधील सत्तापालटाने हा आशावाद संपला. 'जमात-ए-इस्लामी', 'हिजबुत तहरीर' आणि 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'शिवाय अनेक इस्लामिक संघटना बांगलादेशम धील सरकारविरोधी आंदोलनाचे नेतृत्व करत आहेत. अमेरिकेतील एक प्रभावशाली वर्गही आंदोलकांना पाठिंबा देत होता. भारतीय गुप्तचर यंत्रणेला या कटाचा कोणताही सुगावा नव्हता. सत्तापालट झाल्यापासून बांगलादेशमध्ये अल्पसंख्याकांवर आणि विशेषतः हिंदूंवर वारंवार हल्ले होत आहेत. मंदिरे पाडली जात आहेत, संतांवर अत्याचार केले जात आहेत, हिंदू अधिकाऱ्यांना राजीनामे देण्यास भाग पाडले जात आहे, महिलांचा छळ केला जात आहे, त्यांची घरे लुटली जात आहेत.

या घटनांकडे बांगलादेश सरकारचे लक्ष वेधले असता, ही आपली अंतर्गत बाब असून या घटना जातीय नसून राजकीय असल्याचा युक्तिवाद केला जात आहे. बांगलादेशमधील काही घटनांमागे राजकीय कारणे असू शकतात, कारण तेथील अल्पसंख्याक वर्ग हा अवामी लीगला पाठिंबा देतो; पण त्यांच्यावरील हल्ल्यांमागे जातीय द्वेष नाही असे म्हणणे चुकीचे ठरेल. बांगलादेशमध्ये कट्टरवाद्यांचे वर्चस्व वाढत आहे.

'जमात-ए-इस्लामी'वरील बंदी उठवण्यात आली आहे. पूर्वीच्या सरकारने तुरुंगात डांबून ठेवलेल्या कट्टरपंथीयांची सुटका झाली आहे. अंतरिम सरकारला पाठिंबा देणारी 'हिजबुत तहरीर' ही कट्टर इस्लामी संघटना जगभरात खलिफात स्थापन करण्यावर विश्वास ठेवते. दुसरे म्हणजे बांगला देश केवळ झुकत नाही, तर पाकिस्तानशी संलग्न होत आहे.

## चर्चा आजची

# विकृतीला रोखण्याची गरज

**प्रमोद जाधव**

आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर महिलेने समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. परंतु महिलांची ही प्रगती आजही काही विकृतीसाठी डोकेदूखी ठरत आहे. त्यांची प्रगती रोखण्यासाठी शारिरीक, मानसिक त्रास देण्याचा प्रकार समाजात सुरू आहे. त्यामध्ये महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत आहे. अपहरण, अत्याचार, विनयभंग करून महिलांचे मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या विकृतीला रोखण्याची गरज आहे.

महिलांना पुर्वी घराच्या बाहेर पडू देत नव्हते. चुल व मूल या चाकोरीतच महिलांना ठेवण्यात आले होते. थोर समाज सुधारकांनी प्रबोधनाच्या माध्यमातून ही प्रथा मोडीत काढत जनजागृती केली. आपल्या कार्यातून समाज प्रबोधनाचे काम करीत मुलगी, महिला शिकली पाहिजे या भूमिकेतून काम केले. त्यामध्ये महात्मा ज्योतीराव फुले, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेक महापुरुषांचा मोलाचा वाटा राहिला आहे. महिलांना शिक्षणाचे माध्यम खुले करून महापुरुषांनी त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. शिक्षणामुळे मुली, महिला बोलू लागल्या. अन्यायाविरोधात लढा देऊ लागल्या. घराचा उंबरठा न ओलांडण्याचा दबाव असलेल्या महिला आज समाजात ताठ मानेने वावरत असल्याचे चित्र आहे. शासनाने बेटी बचाव, बेटी पढाव, सुकन्या योजना अशा अनेक योजना राबवून मुलीच्या जन्माचे महत्व वाढविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण व शहरी भागात वेगवेगळे उपक्रम राबवून मुलींचे महत्व पटवून देण्यात आले.

गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांसह सासरच्या मंडळींविरोधात गुन्हे दाखल करून एक वेगळा अंकुश कायद्याच्या धाकामुळे समाजात निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आज पुरुषांच्या बरोबरीने महिला व मुली वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहे. शिक्षणामध्येदेखील मुली अव्वल असल्याचे दहावी, बारावीच्या निकालावरून दिसून येत आहे. कुटूंब सांभाळणाऱ्या महिला समाज, तालुका, जिल्हा, राज्य तसेच देशाचा कारभार सक्षमपणे चालवित आहेत. त्यामध्ये भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्यासह अनेक महिलांनी त्यांच्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. सध्या देशाच्या राष्ट्रपती म्हणून द्रौपदी मुर्मू कार्यरत आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंचासह देशातील राष्ट्रपती म्हणून महिला आज सक्षमपणे काम पहात असल्याचे चित्र आहे. राजकीय क्षेत्राबरोबरच क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. महिलेला सरस्वती, शारदा, दुर्गा, महालक्ष्मीचे स्थान दिले जात आहे.

समाजात एका बाजूला महिलेचा आदर होत असताना दुसऱ्या बाजूला महिलेला दुय्यम स्थान देण्याचा प्रकार वाढत असल्याचे चित्र आहे. महिला म्हणजे एक उपभोगण्याचे साधन आहे. या दृष्टीने बघून महिलांवर अत्याचार, विनयभंग तसेच अल्पवयीन मुलीचे अपहरण करण्याचा प्रकार वाढू लागला आहे.

महिला सुरक्षेच्या दृष्टीने नवनवीन कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. वेगवेगळे उपक्रम राबवून महिला सुरक्षेबाबत जनजागृती केली जात आहे. परंतु एका कानाने ऐकायचे आणि दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे याप्रमाणे समाजात काही विकृती वाढू लागली आहे.

महिलांवरील अत्याचार हा एक गुन्हा आहे. तो एक आकडा असला, तरी मात्र त्या महिलेला व त्यांच्या कुटूंबाला होणारा त्रास हा फार मोठा मनस्ताप आहे.

शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थीनींसह वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणी, महिला सुरक्षित आहेत, का असा प्रश्न उपस्थित होत आहे. अल्पवयीन मुलींचे अपहरण करणे, महिला, तरुणीवर अत्याचार करण्याचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे. संबधितांविरोधात गुन्हे दाखल केले जातात. परंतु पुन्हा अत्याचार, विनयभंग व अपहरणाचा आकडा काही कमी व्हायला तयार नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. महिलेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलल्यास समाजात आमुलाग्र बदल होण्यास वेळ लागणार नाही. अपहरण, अत्याचाराच्या घटनांवरही नियंत्रण होण्यास मदत होईल. महिला, तरुणींवरील अत्याचार रोखणे ही काळाची गरज आहे.

## लोकसंसद

### अशावेळी एखादा वाघ बिथरला तर...?

नागपूर आणि भंडारा जिल्ह्यातील 'उमरेड पवनी कऱ्हांडला' अभयारण्यातील 'एफ-२' नावाची वाघीण तिच्या पाच बछड्यांसह गोठणगाव तलावाजवळ जात असताना जिप्सी चालकांनी व पर्यटक मार्गदर्शकांनी त्यांचा रस्ता बराच वेळ अडवून ठेवला होता. ३१ डिसेंबरच्या या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्यानंतर वन्यप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली. वास्तविक संरक्षित वन्य क्षेत्रात पर्यटन करताना शक्यतो जंगलाला साजेसे कपडे घालणे, छायाचित्र घेताना वन्य प्राण्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, मोठ्याने न बोलणे, वाघ आणि इतर वन्यप्राण्यापासून किमान ३० मीटर अंतर ठेवणे, दोन गाड्यांमध्ये किमान ५० मीटर अंतर ठेवणे, वाहनाची वेग मर्यादा पाळणे असे अनेक नियम सर्वांना बंधनकारक आहेत. मात्र जिप्सी चालक, मार्गदर्शक व पर्यटक हे बहुतेक वेळा हे नियम पायदळी तुडवतात. एखादा वाघ दिसला की त्याच्या भोवती २५-३० जीपगाड्यांनी गराडा घातला जातो. त्यामुळे वाघाच्या नैसर्गिक जीवनात अडथळा येतोच शिवाय अशा मनमानी पद्धतीने वागल्यामुळे एखादा वाघ बिथरला तर पर्यटकांच्या जीवावरही बेतू शकते. पर्यटनाच्या नावावर अशा प्रकारच्या घटना वारंवार होत असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले हे ते योग्यच झाले.

**– प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

### पक्षपाती राज्यपालांमुळे पदाची शोभा

भारताच्या राजकारणात पूर्वीपासूनच काही अपवाद वगळता राज्यपालांची कारकीर्द वादग्रस्त राहिली आहे. राजकारणात निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्यांची राज्यपालपदी नियुक्ती करणे हा काँग्रेसने पाडलेला पायंडा भाजपनेही तसाच पुढे सुरु ठेवला आहे. केंद्रात ज्या पक्षाचे सरकार असेल तो पक्ष ज्या राज्यात सत्ता नसेल त्या राज्यात आपल्या मर्जीतील राज्यपाल नियुक्त करतो आणि त्याच्या माध्यमातून राज्यसरकारच्या नाकी नऊ आणतो. काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात अवलंबलेले हे धोरण निदान भाजपने तरी टाळायला हवे होते. पण मागील काही वर्षातील राज्यपालांच्या नियुक्त्या आणि त्या राज्यपालांचे वर्तन पाहता भाजप काँग्रेसच्याच पावलावर पावले टाकतोय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रात तत्कालिन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचे प्रताप अजूनही विस्मरणात गेलेले नाहीत. तसेच प्रताप सध्या तामिळनाडूतील राज्यपाल रवी करताना दिसत आहेत. सलग दोन वर्ष त्यांनी अभिभाषण केलेले नाही. **– दीपक काशिराम गुंडये,** वरळी.

## दिनविशेष

# पृथ्वी परिभ्रमण दिन

पृथ्वी परिभ्रमण दिन दरवर्षी ८ जानेवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस पृथ्वीच्या स्वतःच्या अक्षाभोवती परिभ्रमणाच्या वैज्ञानिक महत्त्वाची जाणीव करून देतो. पृथ्वी स्वतःभोवती २४ तासांत एक प्रदक्षिणा पूर्ण करते, ज्यामुळे आपल्याला दिवस आणि रात्र अनुभवता येतात. पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे सजीवांना अनुकूल हवामान, सूर्यप्रकाश, आणि तापमानाचा समतोल मिळतो. यामुळेच पृथ्वीवर जीवन अस्तित्वात आहे. पृथ्वीच्या या प्रक्रियेचा अभ्यास वैज्ञानिक आणि खगोलशास्त्रज्ञांसाठी महत्त्वाचा आहे, कारण यामुळे हवामान, वेळ, आणि पृथ्वीच्या हालचालींवर होणारा परिणाम समजण्यास मदत होते.

पृथ्वी परिभ्रमण दिन आपल्याला निसर्गाच्या या अद्भुत चक्राबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करतो. हा दिवस आपल्याला पृथ्वीच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आणि निसर्गाशी सुसंगत जीवन जगण्याचे महत्त्व सांगतो. पृथ्वीवरील संतुलन जपण्यासाठी मानवाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

पृथ्वी ज्या अक्षावर फिरते ती एक काल्पनिक रेषा आहे, जी पृथ्वीवरून सरळ काढली जाते. अक्ष उत्तर ध्रुवाला दक्षिण ध्रुवाशी जोडतो. पृथ्वी या जवळच्या-उभ्या अक्षावर दर २४ तासांनी फिरते. या कारणास्तव, एका दिवसात २४ तास असतात. याव्यतिरिक्त, सूर्याभोवती फिरण्यासाठी फक्त ३६५ दिवस लागतात. यामुळे ३६५ दिवस म्हणजे एक वर्ष. तथापि, आपला दिवस किंवा वर्ष किती लांब आहे, हे पृथ्वीचे परिभ्रमण केवळ ठरवत नाही. पृथ्वीचे परिभ्रमण ऋतू देखील ठरवते. पृथ्वी फिरत असताना, सूर्य विविध कोनांवर तीव्र होतो. वर्षभरातील पृथ्वीच्या अंतराळातील विविध स्थानांमुळे आपल्याला वेगवेगळे नक्षत्रही पाहायला मिळतात. पृथ्वीचे परिभ्रमण कोरिओलिस इफेक्टसाठी देखील जबाबदार आहे, जे हवेच्या प्रवाहांचे विघटन आहे. उत्तर गोलार्धात हवा उजवीकडे (घड्याळाच्या दिशेने) आणि दक्षिण गोलार्धात डावीकडे (घड्याळाच्या विरुद्ध दिशेने) विचलित होते. जेव्हा उच्च-दाबाचे वारे ३० अंश 'छ' पासून पश्चिमेकडे वाहतात तेव्हा व्यापारी वारे येतात. जेव्हा हवेचे प्रवाह पूर्वेकडे वळवले जातात तेव्हा पश्चिमेकडे वारे येतात. चंद्र पृथ्वीभोवती फिरतो, जो सूर्याभोवती फिरणाऱ्या अनेक ग्रहांपैकी एक आहे. पृथ्वी मूलभूतपणे गोलाकार आहे आणि सूर्य हा शेजारचा तारा आहे, एक प्रचंड वायूचा गोळा आहे जो आण्विक प्रक्रियेच्या परिणामी प्रकाश आणि उष्णता उत्सर्जित करतो. सूर्य गोलाकार पृथ्वीची एक बाजू प्रकाशित करतो. पृथ्वी दर २४ तासांनी एकदा आपल्या अक्षाभोवती फिरते आणि दर ३६५ दिवसांनी एकदा सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते. पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे आपण दिवस आणि रात्र बदल अनुभवतो. 'एक दिवस' हा शब्द पृथ्वीला त्याच्या अक्षावर, चोवीस तास प्रदक्षिणा घालण्यासाठी लागणारा वेळ दर्शवतो. पृथ्वीवर दोन प्रकारच्या हालचाली आहेत. ते अनुक्रमे रोटेशन आणि क्रांती आहेत. या दोन हालचालींमुळे वेगवेगळ्या प्रकारच्या घटना घडतात.पृथ्वीचे परिभ्रमण हे पृथ्वीच्या अक्षाभोवती फिरते किंवा फिरते तेव्हाच्या हालचालीचे वर्णन करते. पृथ्वी सूर्याभोवती फिरते त्या हालचालीला पृथ्वीची क्रांती असे म्हणतात.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ जानेवारी

१) श्री.वसंत हरि कवळे
विद्यानगर अलिबाग,
८-१-१९४४

२) श्रीम.प्रतिभा अनंत देवघरकर,
अलिबाग, ८-१-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दुर्वेश नितीन म्हात्रे**
**स्मरणार्थ अलिबाग**

# किमान मनाची लाज बाळगावी

## • अंजली दमानियांची संतप्त प्रतिक्रिया

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंड वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचे कसे संबंध आहेत. व्यवहार एकत्र आहेत. जमिनी एकत्र आहेत. कंपनी एकत्र आहे. दहशत एकत्र आहे. कराड आणि मुंडे यांचे याबाबतचे हजारो व्हिडीओ समोर आले असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या आहेत. एवढं सगळं होऊनही धनंजय मुंडेंनी जनाची नाही तर किमान मनाची लाज बाळगायला हवी आणि राजीनामा दिला पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया दमानिया यांनी व्यक्त केली आहे. मुंडे जोपर्यंत राजीनामा देणार नाहीत, तोपर्यंत लढायला हवं असेही दमानिया म्हणाल्या आहेत.**



अंजली दमानिया यांनी सोमवारी (दि.६) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली, त्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या. यावेळी, मुख्यमंत्र्यांसोबत काय चर्चा झाली याची माहिती त्यांनी माध्यमांना दिली. अंजली दमानिया यांनी बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यात, बीड जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकाऱ्यांची नेमणूक बिंदू नामावलीप्रमाणे झाली आहे का, याची चौकशी व्हावी. तसेच, बीड जिल्ह्यातील विना नंबर प्लेटची वाहने ताब्यात घ्यावा. वाल्मिक कराडच्या नावावर अनेक बार आहेत. कायदा धाब्यावर बसवून हे परवाने देण्यात आले आहेत, त्यावर चौकशी आणि कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांनी जॉईंट सीपी क्राईम आणि मुंबई पोलीस आयुक्तांना तक्रार देण्याचे देखील सांगितले असल्याचे दमानिया यांनी सांगितले आहे.

> **“वाल्मिक करडा हा मुंडेंच्या जवळचा कार्यकर्ता आहे. तर, हत्येतील आरोपी विष्णू चाटे त्यांच्या पक्षाचा तालुकाध्यक्ष होता. सर्वच आरोपींचे धनंजय मुंडेसोबत जवळचे संबंध समोर येत आहेत, त्यामुळे त्यांनी स्वतःहून राजीनामा देऊन निःष्पक्ष चौकशीची वाट मोकळी करुन द्यायला पाहिजे.”**
> **– अंजली दमानिया, सामाजिक कार्यकर्ती**

### इन कॅमेरा चौकशीची मागणी

**बीड हत्या प्रकरणात नेमलेली एसआयटी रद्द करण्यात यावी. या एसआयटीमध्ये वाल्मिक कराड आणि इतर आरोपींचे जवळचे संबंध असलेले अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी नेमलेले आहेत. बीड हत्याप्रकरणाची सर्व चौकशी इन कॅमेरा घेण्यात यावी. वाल्मिक कराड आणि इतर आरोपींना ज्या कोठडीत ठेवण्यात आले आहे, त्या ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यात यावा. अशी मागणी अंजली दमानिया यांच्याकडून करण्यात आली आहे.**

# दहशत पसरवण्यासाठीच सिद्दिकींची हत्या

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माजी राज्यमंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी ४ हजार ५९० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. सिद्धिकी यांची हत्या लॉरेन्स बिष्णोई याचा भाऊ अनमोल बिष्णोई याने दहशत पसरवण्यासाठीच केल्याचे आरोपपत्रात म्हटले आहे. इतकेच नव्हे तर, समाजात भीती आणि वर्चस्व निर्माण करण्यासाठी या हत्येचा कट रचण्यात आल्याचे पोलिसांनी आरोपपत्रात दाखल केले आहे.



१२ ऑक्टोबर रोजी सिद्दिकी यांच्यावर सहा गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. त्यापैकी दोन त्यांना लागल्या. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले आणि लीलावती रुग्णालयातउपचारमिळण्याआधीच त्यांचा मृत्यू झाला होता. सिद्दिकी यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळावरून दोन हल्लेखोरांना अटक केली; तर पुणे, अकोला, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरयाणा, पंजाब येथून इतर आरोपींची धरपकड करण्यात आली. सिद्दिकी यांच्यावर गोळ्या झाडणारा शूटर शिवकुमार गौतम याला उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली होती. एकूण २६ आरोपींना अटक करण्यात आली असून कुख्यात लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ अनमोल, शुभम लोणकर आणि जिशान अख्तर या तीन फरार आरोपींचा शोध सुरू आहे. आरोपपत्राचा हवाला देणाऱ्या या अहवालात अभिनेता सलमान खानशी असलेली बाबा सिद्दिकी यांची जवळीक तसेच अनुज थापनच्या आत्महत्येचा बदला ही गुह्याची इतर कारणे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी २०० हून अधिक साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत.

# मनोर ट्रॉमा केअर व्हेंटिलेटरवर



**। पालघर । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील मनोर येथे २०१८ साली ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचे काम सुरू झाले होते. मात्र, सहा वर्षे उलटूनही या इमारतीचे काम ९० टक्केच पूर्ण झाले आहे. या ट्रॉमा केअर सेंटरसाठी वैतरणा नदीच्या पात्रातून पाणी आणण्यासाठी पाइपलाइन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी अजूनही सुमारे साडेचार किमी जलवाहिनी टाकण्याचे काम प्रलंबित आहे. २०२२ साली २०० खाटांच्या जिल्हा सिव्हिल हॉस्पिटलच्या मुख्य इमारतीच्या उभारणीचे काम सुरू झाले. या इमारतीचे काम आता ७३ टक्के पूर्ण झाले आहे. या हॉस्पिटलसाठी १४८ कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी करण्यात आली. २०२४ साली केंद्र सरकारकडून जवळपास १५० कोटी रु. राज्य सरकारला देण्यात आले. मात्र, निधी उपलब्ध होऊनदेखील सिव्हिल रुग्णालयाचे काम रखडल्याचे संबंधित ठेकेदाराने सांगितले आहे.

# दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण, डोंबिवली शहरांच्या विविध भागात अति वेगाने दुचाकी चालविणारे तसेच दुचाकीवर तीन ते चार जण बसून प्रवास करणाऱ्या १५० हून अधिक तरुणांवर गेल्या दोन दिवसात पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली आहे. या कारवाईचा दुचाकीस्वारांनी धसका घेतला आहे. रात्री दहा वाजल्यानंतर ते मध्यरात्रीच्या वेळेत काही तरुण दुचाकीस्वार वाहनातील तांत्रिकतेचा गैरफायदा घेत विविध प्रकारचे जोराचे आवाज काढतात. रात्रीच्या वेळेत हे प्रकार घडत असल्याने शांततेचा भंग होतो. अशा मुलांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून समज दिली जात आहे.

# तुमचा तो आव आता कुठे गेला?

## ठाकरे गटाचा भाजपाला सवाल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीच्या वेळी भाजपाने आपल्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणी, आशा सेविकांपासून शेतकऱ्यांपर्यंत घोषणा आणि आश्वासनांचा पाऊस पाडला होता. तसेच, शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार म्हणजे देणारच, असा आव भाजपाने जाहीरनाम्यात आणला होता. परंतु, भाजपा याबाबतीत उदासीन असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, तुमचा तो आव आता कुठे गेला? असा प्रश्न ठाकरे गटाने केला आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी ही सर्व मंडळी राज्यातील तमाम ‘लाडक्या बहिणीं’चे ‘लाडके भाऊ’ वगैरे झाले होते. या योजनेवरून त्यांनी स्वतःच



स्वतःला पंचारती ओवाळून घेतल्या होत्या. विधानसभा निवडणुकीत या मंडळींना जे यश मिळाले त्यात मोठा वाटा याच लाडक्या बहिणींचा आहे, असे ते मोठ्या तोंडाने सांगत होते. मात्र, आता सत्तेत बसल्यावर यांच्या मोठ्या तोंडाचा चंबू झाला आहे आणि लाडक्या बहिणींना ‘निकषां’च्या चाळणीमध्ये ढकलण्याचे उद्योग त्यांनी सुरू केले आहेत. या चाळणीतून सुमारे ५० लाख ‘लाडक्या’ बहिणी ‘नावडत्या’ होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच, निकषांत न बसणाऱ्या बहिणींना अपात्र ठरवून त्यांच्या खात्यात जमा झालेले पैसे परत सरकारजमा करण्याच्या ‘सावकारी’ला सुरुवातदेखील झाली आहे, अशी टीका ठाकरे गटाने केली आहे.

धुळे जिल्ह्यातील एका लाडक्या बहिणीला सरकारच्या या घूमजाव धोरणाचा फटका बसला आहे. तिला मिळालेले ७ हजार ५०० रुपये परत सरकारजमा करण्यात आले आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी उफाळून आलेले सत्ताधाऱ्यांचे ‘बंधूप्रेम’ सत्तेत बसताच असे आटत चालले आहे, असे टीकास्त्र शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने सोडले आहेत.

मोदी सरकारच्या महाराष्ट्रातील ‘चेले-चपाटे’ सरकारनेही राज्यातील शेतकऱ्यांच्या तोंडाला पानेच पुसली आहेत. जाहीरनाम्यात शेतकरी कर्जमाफी देऊ, असे सांगायचे आणि सत्तेत बसल्यावर हात वर करायचे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरूनही या मंडळींनी घूमजाव केले आहे. खुद्द राज्याच्या कृषी मंत्र्यांनीच लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर ‘ताण’ पडत असल्याने शेतकऱ्यांनी कर्जमाफी विसरावी, असे जाहीर करून हात वर केले आहेत, अशी टीका ठाकरे गटाने केली आहे.

# करूणा शर्मांची हायकोर्टात धाव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध करुणा शर्मा यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. त्यांनी केलेल्या याचिकेत धनंजय मुंडे यांनी भ्रष्ट मार्गाने निवडणूक जिंकल्याचा आरोप केला आहे. धनंजय मुंडेंनी पहिल्या पत्नीच्या नावावरील मालमत्ता आणि कोर्टातील प्रलंबित प्रकरणांची माहिती लपवली असल्याचा आरोप करुणा शर्मा यांचा आहे. करुणा शर्मांचे वकील चंद्रकांत ठोंबरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, करुणा मुंडे यांचा फॉर्म ३० ऑक्टोबरला चुकीच्या मार्गाने फेटाळला होता. त्याविरोधात आणि धनंजय मुंडे यांची जी निवड झालीय ती करप्ट प्रॅक्टिस आहे. त्यामुळे आम्ही करुणा मुंडे मार्फत उच्च न्यायालयात एक इलेक्शन पिटीशन दाखल केली आहे. त्यामध्ये आमचे प्रमुख मुद्दे आहेत की, धनंजय मुंडे यांनी आपल्या पहिल्या पत्नी जी कायदेशीर पत्नी असून, तिचा कुठे उल्लेख केलेला नाही. तिच्या प्रॉपर्टी संदर्भात कुठलाही उल्लेख केलेला नाही. फक्त तिच्याकडून झालेल्या दोन मुलांचा उल्लेख केलेला आहे. त्या दोघांमध्ये ज्या केसेस पेंडिंग आहेत, त्याचा कुठे उल्लेख केला नसल्याचे शर्मा यांनी सांगितले आहे.

# चिनी मांजावर कागदोपत्रीच बंदी

**। पालघर । प्रतिनिधी ।**

मकर संक्रांतीच्या सणानिमित्त शहरात विविध प्रकारचे पतंग विक्रीसाठी उपलब्ध आहेत. याही वर्षी पालिकेने धारदार आणि जीवघेण्या चिनी मांजावर बंदी घातली आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीचा अभाव असल्यामुळे शहरात खुलेआम चिनी मांजाची विक्री होत आहे. त्यामुळे संक्रांतीच्या काळात नागरिक तसेच पक्ष्यांच्या जीवाला धोका आहे. वसई-विरार महानगरपालिका चिनी मांजावर केवळ कागदोपत्री बंदी घालत असल्याचा आरोप अनेक



सेवाभावी संस्थांनी केला आहे.

चिनी व नायलॉन मांजा अत्यंत धारदार असल्याने पक्ष्यांच्या गळ्याला कापण्याचे प्रकार घडतात. त्यांच्या पंखांना गंभीर दुखापत होऊन अनेक पक्ष्यांना प्राण गमवावे लागतात. तुटलेल्या मांजामुळे नागरिकदेखील अपघातग्रस्त होतात. दुचाकीस्वारांच्या गळ्याला मांजा अडकून अनेकांचा जीव गेल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. गेल्या वर्षी अनेक सेवाभावी संस्था व प्राणी भाईंदर ते वसई संघटनांनी मुंबई, मीरा विरारदरम्यान १४ व १५ जानेवारी रोजी २५ पेक्षा जास्त ठिकाणी जखमी पक्ष्यांवर उपचार करण्यासाठी कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पमध्ये ८०० जखमी पक्ष्यांवर उपचार करण्यात आले. तर, १ हजाराहून अधिक पक्ष्यांना जीव गमवावा लागला होतो.

# ‘संवेदनशीलपणे विचार करावा’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यावर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुरेश धस, प्रकाश साळुंके यांच्यासह अनेकांची भावना आहे की त्यांनी राजीनामा द्यावा. सरकारने संवेदनशीलपणे या सर्वांचा विचार करावा. तसेच, अशोक चव्हाणांवर आरोप झाले त्यावेळी नैतिकता बघून अशोक चव्हाणांनी राजीनामा दिला होता. त्यामुळे आता सरकारला ठरवायचे आहे की त्यांनी काय करावे.

# रत्नागिरीत मलपी नौकांचा हैदोस

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरीच्या समुद्रात तामिळनाडूच्या मलपी वेगवान मासेमारी नौकांनी हैदोस मांडला आहे. समुद्राच्या तळापासून पाण्याच्या पृष्ठभागापर्यंतचा मासा अक्षरशः खरवडून नेला जात आहे. त्यामुळे स्थानिक मच्छीमारांना मासळी मिळेनाशी झाली आहे. परप्रांतीय नौका अशा प्रकारे मासा मोठ्या प्रमाणात जाळ्यात पकडून नेत आहेत. परंतु, स्थानिक पातळीवर मासे मिळण्याच्या मुद्यावर पारंपरिक मच्छीमार पर्ससीननेट मासेमारीवर उंगलीनिर्देश करत आहेत. या परप्रांतीय नौकांना



आवरणे सहाय्यक मत्स्यव्यवसाय विभागाच्या गस्ती नौकेलाही जड जात आहे.

मासळी मिळतच नसल्याने गेल्यावर्षी तब्बल ४१६ नौका कमी झाल्या आहेत. नौका कमी होऊनही त्यांना मासळी मिळण्याचा रिपोर्टही फारच कमी होता. सन २०२१-२२ च्या तुलनेत गेल्या वर्षी तब्बल ३८ हजार ५११ मे. टनने मासळी कमी मिळाली. जिल्ह्यात २ हजार ५२० मच्छीमार नौका आहेत. पारंपरिक नौकांसह यातील पर्ससीननेट नौकांना सुद्धा मासळी कमी मिळाली. यातून पर्ससीननेट आणि पारंपारिक मच्छीमारांमध्ये दरवर्षी वाद होत असतात. परंतु, मासळी कमी मिळण्याचे प्रमाण परप्रांतीय मलपी नौकांमुळे होत आहे, याकडे कुणाचेच लक्ष नाही.



# कोयना प्रकल्प पुन्हा नव्याने सज्ज

## वीजनिर्मिती यंत्रणेचे ८० टक्के काम पुर्ण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोयना प्रकल्पातून वीजनिर्मिती करणाऱ्या यंत्रणेचे ८० टक्के आधुनिकीकरण पूर्ण झाले असून २० टक्के काम शिल्लक आहे. वर्षभरात ते पूर्ण करून राज्यात मागणीच्या वेळी या प्रकल्पातून सक्षमतेने वीज निर्मिती करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती प्रकल्पाचे मुख्य अभियंता संजय चोपडे यांनी दिली. नव्या वर्षात कोयना प्रकल्प वीजनिर्मिती करण्यासाठी पुन्हा नव्याने सज्ज असेल, असा विश्वास देखील चोपडे यांनी व्यक्त केला आहे.

वीजनिर्मिती करणाऱ्या संचामध्ये काही वर्षांपासून सातत्याने बिघाड सुरू होता. दुरुस्तीसाठी काही मशीन दीर्घकाळ बंद ठेवावे लागत होते. त्यामुळे प्रकल्पातून पूर्णक्षमतेने वीजनिर्मिती करता येत नव्हती. त्याचा परिणाम राज्याच्या वीजनिर्मितीवर होत होता. २०२१ मध्ये चिपळूणमध्ये महापूर आला होता. पोफळी, अलोरे परिसरात अतिवृष्टी झाली. त्यामुळे तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील वीजनिर्मितीवरही परिणाम झाला होता. कोयना प्रकल्पाची उभारणी करून ६० वर्षे झाली. तेव्हा बसवलेली यंत्रे कालबाह्य झाल्यामुळे त्याचे सुटे भागही बाजारात मिळत नाहीत. त्यामुळे वीजनिर्मिती करणाऱ्या संचाची दुरुस्ती कशी करावी, असाही प्रश्न महानिर्मिती कंपनीसमोर होता.

तसेच, नवीन मशीन घ्यायचे झाल्यास त्यासाठी शेकडो कोटींचा खर्च महानिर्मिती कंपनीला येणार होता. त्यामुळे आहे त्या मशीनचे आधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. चोपडे यांनी पोफळी येथील कार्यालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर आधुनिकीकरणाला गती दिली. प्रथम पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील जुनी यंत्रणा बदलली. त्यानंतर तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील कालबाह्य झालेली यंत्रणा बदलून नवीन यंत्रणा बसवली. जुनी यंत्रणा बदलून नवीन यंत्रणा बसवण्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. वर्षभरात उर्वरित काम पूर्ण होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# ठाण्यातील इमारतीत अग्नीतांडव

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

बाळकुम परिसरातील छबय्या पार्कमधील एका फ्लॅटला रविवारी (दि.५) रात्रीच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली होती. या आगीची तीव्रता इतकी होती की याच मजल्यावरील आजूबाजूच्या चार घरांना देखील त्याची झळ बसली. त्यामुळे या आगीत जवळपास पाच घरांचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच ठाणे पालिकेच्या अग्निशमन दलाने धाव घेत इमारतीमध्ये अडकलेल्या ४० रहिवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. सुमारे तासाभरानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले असून या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आपत्ती विभागाने दिली.

ठाण्यातील बाळकुम येथे छबय्या पार्क येथे सहा मजली इमारत आहे. या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या काजल प्रसाद या भाडोत्री असून त्या घरी असताना रविवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास आग लागली. आगीने काही क्षणात रौद्र रूप धारण केल्याने आगीची झळ बाजूच्या खोल्यांनाही बसली. यादरम्यान, इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कापूरबावडी पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांनी धाव घेतली. या मजल्यावर अडकलेल्या जवळपास ४० नागरिकांना सुरक्षेच्या दृष्टीने सुखरूप बाहेर काढण्यात आले. तसेच, अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. आग रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास पूर्णपणे



नियंत्रणात आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा कोणालाही दुखापत झाली नाही, अशी माहिती ठाणे पालिकेच्या आपत्ती विभागाचे वरिष्ठ अधिकारी यासीन तडवी यांनी दिली.

# पालघर जिल्हा भूकंपाने हादरला

**। पालघर । प्रतिनिधी ।**

नवीन वर्षाच्या पहिल्या आठवड्यातच मंगळवारी (दि.७) पहाटे साडेचारच्या सुमारास डहाणू व तलासरी तालुका भूकंपाने हादरून गेला. बोर्डी, दापचरी, धुंदलवाडी, चिंचले, हळदपाडा या परिसरात एकामागोमाग एक भूकंपाचे तीन धक्के जाणवल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ऐन थंडीत झालेल्या भूकंपामुळे अनेक जण जीवाच्या आकांताने घराबाहेर पळत होते. या भूकंपाची ३.७ रिश्टर स्केलची नोंद झाली असून



केंद्रबिंदू गुजरातच्या वलसाडमध्ये असल्याचे दिसून आले आहे. भूकंपाच्या हादऱ्यांमुळे काही घरांना तडे गेलेले आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. पालघर जिल्ह्यात अधूनमधून भूकंपाचे धक्के बसतच आहेत. विशेषतः २०१८ पासून डहाणू, तलासरी या भागात मोठ्या प्रमाणावर याआधीही अनेकदा भूकंप झाले आहेत.

## हापूस आंब्याच्या आधीच आगमन | एपीएमसीत पेटीला १७ हजार रुपयांचा दर

# देवगडच्या केसर आंब्यांनी मुहूर्त साधला

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**नवी मुंबईतील वाशी येथील एपीएमसी फळ बाजारात दरवर्षी नोव्हेंबर ते जानेवारी महिन्यात कोकणातील देवगड येथील हापूसच्या मुहूर्ताची पहिली पेटी दाखल होत असते. यंदा मात्र हापूस हंगामाला विलंब होणार असून कोकणातील केसर आंब्यांनी हापूसच्या आधीच मुहूर्त साधला आहे.**

सोमवारी (दि.६) एपीएमसी बाजारात केशर आंब्याची पाच डझनाची पहिली एक पेटी दाखल झाली आहे. या पहिल्या पेटीची १७ हजार रुपये दराने विक्री झालेली आहे.

दरवर्षी हापूस आंब्याची मार्चमध्ये आवक वाढण्यास सुरुवात होते तर जानेवारी-फेब्रुवारीपासून हापूस दाखल होण्यास सुरुवात होते. त्यामुळे खवय्यांना हापूस आंब्याची चव चाखण्यासाठी मार्चपर्यंत वाट पहावी लागते. मात्र, त्याआधी एपीएमसी बाजारात देवगड येथील हापूस बाजारात दाखल होत असतो. मागील वर्षी देवगड येथील शिंदे कुटुंबीयांनी २१



नोव्हेंबरला एपीएमसी बाजारात पहिली पेटी पाठवून मुहूर्त साधला होता. परंतु, यंदा हापूसला मोहोर फुटण्याची वेळ आणि अवकाळी पाऊस, कडाक्याची थंडी तसेच हवामान बदल आणि थ्रीप्स रोगाचा प्रादुर्भाव यामुळे फळधारणा झाली नाही. तर, मोहोरही गळून पडला आहे. त्यामुळे यंदा बाजारात हापूस विलंबाने दाखल होणार आहे. मात्र, यावेळी हापूस आधीच कोकणातूनच केसर आंब्याने नंबर लावत आंबा हंगाम सुरु करण्याचा मान पटकावला आहे.

### हापूस हंगामाचे स्वागत

**सोमवारी देवगड तालुक्यातील वाघोटनमधील शेतकरी शकील मुल्ला यांनी आपल्या शेतातील केसर आंब्याची पाच डझनची पहिली पेटी बाजारात एन.डी. पानसरे अँड सन्स यांच्याकडे पाठवली होती. एपीएमसीत हापूसची पहिली पेटी दाखल होताच विधिवत पूजा करून हापूस हंगामाचे स्वागत केले जाते. यंदा केसर आंबा पहिला दाखल झाल्याने त्याची विधिवत पूजा करण्यात आली. तसेच, या आंबा हंगामातील पहिल्या पेटीला १६ ते १७ हजार रुपये बाजार भाव मिळाला आहे. आठ-आठ दिवसांनी या केशर आंब्याची बाजारात आवक सुरू राहील, अशी माहिती व्यापारी संजय पानसरे यांनी दिली आहे.**

# निवडक



## पोलीस रेझींग डे सप्ताह साजरा

**अलिबाग :** स्वयंसिद्धा संचलित स्पर्धा विश्‍व अकॅडमीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली तसेच पोलीस रेसिंग डे व सप्ताह अंतर्गत पोलीस रिझिंग डे साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, अ‍ॅड.निहा राऊत, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी, स्पर्धा विश्‍व अकॅडमीच्या संचालिका तथा स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी व इतर पोलीस कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांनी केले तदनंतर पोलीस निरीक्षक किशोर साळे यांनी उपस्थित स्पर्धा परीक्षांची तयारी करणार्‍या विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधताना पोलीस रेझिंग डे चे महत्व तसेच हा दिवस साजरा करण्यामागचा हेतू यासंदर्भात माहिती दिली. जनता आणि पोलीस यांच्यामध्ये चांगले संबंध निर्माण व्हावे पोलिसां विषयी वाटणारी भीती कमी व्हावी तसेच पोलीस हे जनतेच्या सेवेसाठीच तत्पर असतात असे सांगितले तसेच सध्या बदलत चाललेल्या कायद्यांचे स्वरूप, जुन्या कायद्यांमध्ये झालेले बदल नवीन कायदे कसे उपयुक्त ठरतात तसेच गुन्ह्यांचे बदलणारे स्वरूप, अलीकडे सायबर गुन्ह्यांमध्ये होत चाललेली वाढ व त्यातून होणारे फसवणुकीचे प्रकार रोखण्याकरिता आपण काय तत्परता व काळजी घेतली पाहिजे याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांना दिली.




## अग्नीशमन दलातील जवानांचा सत्कार

**पनवेल :** पनवेल शहरातील जय भारत नाका येथील अश्‍विनी साडीच्या बिल्डिंगमध्ये आग लागली होती. त्यावेळी ११ जण अडकले होते पनवेल अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार पनवेल शहर शाखेतर्फे आज करण्यात आला. शिवसेना पनवेल शहरप्रमुख प्रविण जाधव, उपमहानगरप्रमुख अच्युत मनोरे, युवा सेना जिल्हाप्रमुख पराग मोहिते, शहर संघटक राकेश टेमघरे, उपशहरप्रमुख सन्नी टेमघरे, विभाग प्रमुख जुनैद पवार, अमित माळी, युवा सेनेचे साई सुरज पवार, तालुका संघटक प्रमिला कुरघोडे, शहर संघटक अर्चना कुलकर्णी, उपशहर संघटक उज्वला गावडे, विभाग संघटक अश्‍विनी देसाई, उपविभाग संघटक त्रिवेदी यांनी अग्नीशमन दलाचे अधिकारी बोडखे व सुर्यवंशी तसेच इतर जवानांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.



## रक्तदान महायज्ञ शिबिरास प्रतिसाद

**रेवदंडा :** सद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानाचे वतीने संपुर्ण महाराष्ट्रात ४ जानेवारी ते १९ जानेवारी दरम्यान रक्तदान महायज्ञ शिबिराचा संकल्प करण्यात आला आहे. त्यानिमित्त चौल नरेंद्राचार्य सेवाकेंद्राच्या वतीने रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले, या रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद लाभला, यावेळी एकूण १५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रविवार दि. ५ जानेवारी येथे चौल नरेंद्राचार्य सेवाकेंद्राच्या वतीने आयोजीत रक्तदान शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरास सकाळी ९.०० वाजता शुभारंभ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विकासनी चव्हाण यांचे हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी प्रसाद गोंधळी, संदेश माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- जमिनीची खरेदी व विक्री अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३

- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत रु.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

- किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत रु .१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९

- Resort + Bunglow. Available fully developed Resort +Bunglow Plot Area 15.1 R Land (with exclusix Access 3.0R) on chondhi kihim Road, just 500 meters from beach, Rate Rs. 30 Lac Per Guntha. Total Lumsum price Rs 4.5 crore. All cheque payment 9822257929.

- Vacancy for Office staff in Alibag Interested Graduate candidates can call 9923750549 For interview

- अलिबाग येथे वाडीमध्ये कामासाठी माणूस पाहिजे. राहण्याची सोय होईल. पगार १०,०००/- मो.नं.९८२००२९४५८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी सतर्क; तरीही चोरी कायम

# नेरळच्या पाण्याची अंधारात चोरी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या नळपाणी योजनेचे काम सुरू आहे. त्यामुळे गावात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असतानादेखील पाण्याची चोरी सुरू आहे. दरम्यान, याबद्दल नेरळ ग्रामपंचायतकिडून ज्या दोन ठिकाणी व्हॉल्व खोलून पाण्याची चोरी केली जाते. त्या ठिकाणी लोखंडी लॉक लावण्याचे आणि टेहळणी ठेवण्याचे आदेश ग्रामपंचायतीचे प्रशासक यांनी कर्मचार्‍यांना दिले आहेत.



नेरळ गावासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून नळपाणी योजना १९९८ मध्ये बनविण्यात आली होती. ही योजना नेरळ ावातील ३६ हजार लोकसंख्येसाठी होती आणि त्या योजनेची मुदत २०१६ मध्ये संपली. त्या योजनेची मुदत संपून आठ वर्षाचा काळ लोटला असून नेरळ ग्रामपंचायत हद्दीमध्ये राहणार्‍या परिसरात लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे नळपाणी योजना अपुरी पडत आहे. ते लक्षात घेवून जीवन प्राधिकरणकडून नवीन नळपाणी योजना मंजूर असून त्या योजनेचे काम सुरू आहे. नवीन नळपाणी योजनेचे काम करण्यासाठी मोहाची वाडी येथील एक जलकुंभ तोडण्यात आले आहे. त्या वेळेपासून नेरळ गावात कमी दाबाने पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे नेरळ ग्रामपंचायत कार्यालयावर दररोज महिला आणि ग्रामस्थ हे मोर्चा घेवून येत असतात.

नेरळ ग्रामपंचायतीमधील सर्व भागाला मोहाची वाडी येथे टेकडीवर असलेल्या जलकुंभामधून पाणी वितरित केले जाते. त्या टाकीतून पाणी सोडण्याचे नियोजन सकाळी सहा पासून सुरू होते आणि सायंकाळीपर्यंत पाणी सोडले जाते.

### नेरळ ग्रामपंचायत करणार पोलिसात तक्रार

**याप्रकरणी नेरळ ग्रामपंचायत आक्रमक झाली असून ग्रामपंचायत कडून तत्काळ पोलीस ठाण्याला तक्रार देण्याची तयार सुरू झाली आहे. दुसरीकडे त्या पाण्याची चोरी रोखण्यासाठी आसपास असलेले सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.**

> “कमी दाबाने पाणी आल्यावर त्या पाण्याची चोरी ही इलेक्ट्रिक मोटार यांचा वापर करून केली जात असल्याच्या तक्रारी आल्या आहेत.त्यामुळे आम्ही मोटार जप्त करून त्यांच्यावर पोलिसात गुन्हे दाखल करण्याची सूचना पाणी पुरवठा विभागाला केली आहे. त्याचवेळी पाण्याचे व्हॉल्व उघडून रात्री पाणी सुरु करणार्‍या सर्वांवर कारवाई करावी यासाठी पोलिसात रीतसर तक्रार देत आहोत.”
>
> – सुजित धनगर, प्रशासक

त्यानंतर नेरळ ग्रामपंचायत पाणी पुरवठा विभाग जलशुध्दीकरण केंद्रात शुद्ध केलेले पाणी मोहाची वाडी येथे पाठवण्याचे काम करते. जेणेकरून दुसर्‍या दिवशी सकाळी सर्व भागाला पाणी वितरित करणे सोपे जावे, यासाठी पाणीपुरवठा विभाग सतर्क असतो. मात्र प्रशासकीय राजवटीत नेरळ ग्रामपंचायतीमधील कर्मचारी वर्ग आणखी सतर्क झाला असून पाणी पुरवठा बंद झाल्यावर देखील हे कर्मचारी रात्री सर्व व्हॉल्व तपासात असतात. नेरळमधील काही रहिवाशी हे पाण्याचे व्हॉल्व रात्रीच्या अंधारात सोडून आपल्या भागाला अधिकचे पाणी ओढून घेत असल्याची बाब कर्मचारी वर्गाच्या लक्षात आली आहे. त्यामुळे पाणी कर्मचारी यांनी ही बाब प्रशासक सुजित धनगर आणि ग्रामविकास अधिकारी अरुण कार्ले यांच्या कानावर घातली आहे.

पाणी पुरवठा वितरित करणार्‍या कर्मचार्‍यांना जकात नाका आणि तुलसी समोर असलेले पाण्याचे व्हॉल्व हे सोडून पाण्याची चोरी करीत आहेत. या दोन्ही व्हॉल्ववर चिंच आळी, मोडक नगर, तुलसी आणि बुर्‍हाणी पार्क या भागातील किमान ३० इमारती असून स्थानिकांची २०० हून अधिक घरे आहेत. या भागातील रहिवाशांना दिवसातून दोनवेळा पाणी मिळत असल्याचे आढळून आले आहे. रात्री अंधारात पाण्याचे व्हॉल्व उघडून पाणी चोरी सुरू असून त्याचा परिणाम पाण्याची मुख्य टाकी खाली होण्यावर होत आहे. त्यामुळे नेरळ पाण्याची चोरी रोखावी अशी मागणी होत आहे.

## तळ्यातील माणसं दुर्गम होताहेत–तांडेल

**| तळा | वार्ताहर |**

राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील ‘युथ फॉर माय भारत आणि डिजीटल लिटरसी’ या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरुन विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आज बँक ऑफ इंडिया तळा शाखेचे बँक प्रतिनिधींनी वाघमारे यांनी श्रमदान शिबिरास अचानक भेट दिली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणारे जगन्नाथ तांडेल यांनी तळा तालुक्याला दुर्गम भाग म्हणून ओळखलं जातं पण मी असे म्हणेन की हा तालुका दुर्गम नसुन तालुक्यातील माणसं दुर्गम बनत चालली आहेत अशी खंत व्यक्त केली आणि बँक ऑफ इंडियासारख्या नामांकित बँकेने आमच्या गावातील अंगणवाडीत व शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गावात बँक खाते उघडण्यासाठी कॅम्प आयोजित करावा अशी विनंती केली.

याप्रसंगी भांजी मेंदाडकर, यशवंत खांजी, लक्ष्मण खालू, माया बेडेकर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ दत्ता कुंटेवाड, प्रा.भरत चाळके व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोहा मराठी पत्रकार संघाची कार्यकारिणी



**| कोलाड | वार्ताहर |**

रोहा येथील शासकीय विश्रामगृहात रविवारी (दि.५) महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीत रोहा तालुक्यातील नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे कोकण कार्याध्यक्ष शैलेश पालकर, रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे, खालापूर उपाध्यक्ष अर्जुन कदम, पनवेल तालुका अध्यक्ष सुनिल पाटील उपस्थित होते.

या बैठकीत रोहा तालुका अध्यक्ष किरण मोरे, उपाध्यक्ष संदेश गायकर, खजिनदार दिनेश मोरे, सचिव सुरेश पंधरे तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून अनंता म्हसकर, विश्‍वनाथ कोलते, काशिनाथ बामुगडे, संजय गायकवाड तसेच सल्लगारपदी समीर बामुगडे यांची निवड करण्यात आली. सुधागड तालुक्यातील मंगेश यादव आणि प्रशांत हिगणे यांनीही या बैठकीस उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शैलेश पालकर यांनी भूषवले. मार्गदर्शन करताना त्यांनी पत्रकारिता करताना तटस्थता आणि सचोटी कशी असावी यावर प्रकाश टाकला. त्यांनी अनेक किस्से सांगत पत्रकारिता क्षेत्रातील अनुभव आणि नैतिकता यावर पत्रकारांना मार्गदर्शन केले.

## कर्जत शहरातील सेल्फी पॉईंट दुरवस्थेच्या गर्तेत

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत दिवाणी न्यायालयाच्या शेजारी कर्जत नगरपरिषद प्रशासनाकडुन न्यायदेवतेच्या स्मारकाची उभारणी करण्यात आली आहे.मात्र त्या सेल्फी पॉईंटची दुरवस्था झाली असून पालिका प्रशासन लक्ष देणार आहेत काय? असा प्रश्‍न स्थानिक उपस्थित करीत आहेत.



स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये मिळालेल्या पारितोषिक रकमेतून कर्जत शहरात चौक सुशोभिकरण करण्यात आले. त्या चौक सुशोभीकरण नंतर पालिका प्रशासनाने ढुंकूनदेखील पाहिले नाही आणि त्यामुळे अनेक सेल्फी पॉईंट हे दुरवस्थेच्या गर्तेत आहेत. कर्जत नगरपरिषदेच्या भोंगळ कारभारामुळे नगरपरिषदेने कोपरा गार्डनच्या नावाने संकल्पना राबविली. कर्जत शहरातील दिवाणी न्यायालयाच्या बाजूला असलेल्या न्यायदेवतेच्या मूर्ती आणि परिसर स्मारकाची दुरवस्था झाली आहे. न्यायदेवतेच्या स्मारकावर झाडांच्या फांद्या लोंबकळत होत्या तर न्यायदेवतेच्या स्मारकाच्या एका हातातील तराजु गायब झालेला आहे. तसेच स्मारकाला असलेले बॅरिकेट्सदेखील गायब असून विद्युत रोषणाईचे दिवेही बंद पडलेले आहेत.

या गंभीर बाबीची नोंद ग्रामस्थांनी घेऊनदेखील कर्जत नगरपरिषद प्रशासन यांच्याकडुन कोणतीही दखल घेतली जात नाही स्मारकावर लोंबकळत असलेल्या झाडांच्या फांद्याच छाटून टाकल्या गेल्या.

परंतु, स्मारकाच्या हातातील तुटलेला तराजु बसविलेला नाही तसेच स्मारकाचे गतवैभवदेखील पूर्ववत केलेले नाही. त्यामुळे कर्जत नगरपरिषद ऐतिहासिक, धार्मिक व देशाभिमान जागृत करणाऱ्या स्मारकांबाबत अनभिज्ञ आहे असे दिसून येत आहे. मुख्याधिकारी तथा प्रशासक वैभव गारवे यांनी आपल्या खात्यातील संबंधित विभागातील उदासीन अधिकाऱ्यांवर विसंबून न राहता स्वतः जातीने लक्ष घालून न्यायदेवतेच्या स्मारकाची होणारी विटंबना थांबवून स्मारकाचे गतवैभव प्राप्त करून द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पालिका प्रशासक आणि मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्याकडून या बाबीवर लक्ष दिले जात नसल्यानेदेखील नाराजी व्यक्त होत आहे.

## चेन खेचून चोरटे पसार

**| नवीन पनवेल | वार्ताहर |**

६३ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरदस्तीने खेचून चोरटे मोटरसायकलने पळून गेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



सुजाता ठक्कर या पनवेल येथे राहत असून तीन जानेवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास त्या मोटरसायकल वरून फरसाण घेऊन परत आल्या. आणि इमारतीच्या कंपाउंडच्या आत गाडी पार्क केली. त्या बिल्डिंगच्या पायरी जवळ आले असता पाठीमागून एक इसम आला. यावेळी त्यांनी कोण पाहिजे असे विचारले असता त्याने काहीही उत्तर दिले नाही. आणि जबरदस्तीने ठक्कर यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचली. त्याचा हात पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने धक्का मारून त्यांना खाली पडले आणि तो पळून गेला. यावेळी मोटर सायकलच्या मागे बसून दोघेही इसम पळून गेले. २७ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन चोरून नेणाऱ्या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## डंपरच्या धडकेत वीस वर्षीय तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** भरधाव वेगाने डंपर चालवून वीस वर्षीय तरुणाला धडक दिल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी मोहम्मद अश्रफ याच्या विरोधात खांदेश्‍वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रॉयल ट्रान्स इन्फ्रा या कंपनीच्या डंपर चालकाने नेवाळी गाव क्रिकेट मैदानाजवळ नेवाळी या ठिकाणी क्रशर प्लांटकडून टेंभोंडेकडे जाणाऱ्या रस्त्यावर भरधाव वेगाने डंपर चालवला आणि तारीफ गुलजार हुसेन खान याला पाठीमागून धडक दिली. यात तारीफच्या डोक्याला जबर मार लागून त्याचा मृत्यू झाला आहे.

## अखेर जर्मन शेफर्ड सापडला

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत शहरात रस्त्यावर बिनधास्तपणे मोकाट फिरणारा जर्मन शेफर्ड कुत्रा त्याच्या मालकाच्या हाती अखेर लागला आहे. बहुतेक वेळा श्रीमंतांच्या बंगल्याच्या आवारात असणारा हा जर्मन शेफर्ड रस्त्यावर दिसल्याने अनेकांनी त्याला कौतुकाने पाहिले तर शालेय मुले घाबरून पळू लागली असे चित्र कर्जत शहरात सकाळच्या वेळी होते.

कर्जत शहरातील मुद्रे येथे राहणारे कुत्र्याचे मालक हे आपल्या बंगल्यात बांधून ठेवलेले असलेल्या जर्मन शेफर्ड या कुत्र्याला आज सकाळी फिरायला घेऊन गेले. त्यावेळी हा जर्मन शेफर्ड आपल्या मालकाच्याहातातुननिसटुनपळाला. कुत्रा मालकाने त्या जर्मन शेफर्डचे मागे धाव घेऊन त्याला पकडायचा प्रयत्न केला. आपला कुटुंबातील सर्वांचा लाडका जर्मन शेफर्ड हातातुन निसटुन गायब झाल्यामुळे मालक हवालदिल झाले. जीवापाड जपलेल्या कुत्र्याला शोधण्यासाठी त्या कुत्र्यांच्या मालकाने कर्जत शहर पालथे घातले. शनी मंदिर परिसर, नदीचे किनारे आदी ठिकाणी शोध घेतला. जर्मन शेफर्ड कुत्र्याचा शोध घेत असतानाच कर्जत शहरातील रस्त्यांवर फारसे न दिसणारे जर्मन शेफर्ड दिसल्याने काहींनी त्याचे व्हिडीओ काढले.



### शालेय मुलांनी घेतली मजा.. काहींची तारांबळ..

**सकाळच्या वेळी कर्जत शहरात जर्मन शेफर्ड जातीचा पाळीव कुत्रा मोकाट फिरत आहे. रस्त्यावरुन जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या, नागरिकांच्या मागे मागे धावत आहे. शालेय मुलं घाबरुन पळत आहेत आणि कुत्रा त्यांच्या मागे मागे धावत आहे, असे चित्र दिसले.शालेय विद्यार्थी घाबरून बाजूला जात होते,तर काही विद्यार्थी त्याचा आनंद घेत होते.मात्र रस्त्याने फारसा कधी न दिसणारा जर्मन शेफर्ड दिसल्याने त्याची मजा घेतली तसेच हा जर्मन शेफर्ड नंतर त्याच्या मालकाला मिळाला त्यावेळी त्यांना देखील हायसे वाटले.**

## वाहन चालकाला लुटले; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** वाहन चालकाला लुटल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अमित गायकवाड पिकअपमध्ये सातारा येथून कलिंगड भरून पनवेल मार्केट येथे पोहोचवण्यासाठी संध्याकाळी निघाले. रात्री दोनच्या सुमारास पनवेल एक्झिट येथे आले आणि रस्त्याच्या कडेला पिकअप थांबून लघु शंकेसाठी उतरले. यावेळी झुडपातून तीन इसम अचानक येऊन त्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी खिशातील पाकीट जबरदस्तीने काढून घेतले आणि परत झुडपामध्ये उडी मारून पळून गेले.

### महडला जाण्यासाठी निघालेले पर्यटक येतात महाडला | गुगल मॅपचा आधार ठरतोय अडचणीचा

# ‘सेम स्पेलिंग’मुळे पर्यटकांना बसतो भुर्दंड

**| महाड | उदय सावंत |**

अष्टविनायकांमधील एक असलेले महड या या गणेश मंदिरामध्ये जाण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक भाविक येत असतात. मात्र या भाविकांना तसेच पर्यटकांना एका स्पेलिंगमुळे जवळपास शेकडो किलोमीटरचा प्रवास करण्याचा भुर्दंड बसत आहे. महड आणि महाड यामधील इंग्रजी स्पेलिंग समान येत असल्याने अनेक जण महडला जाण्याऐवजी महाडला येतात.

इंग्रजीमध्ये किंवा युनिकोडमध्ये टायपिंग करताना महड आणि महाड यांची इंग्रजी स्पेलिंग जवळपास समान आहे. महड (MAHAD) आणी ऐतिहासिक महाड(MAHAD) स्पेलिंग देखील एकच आहे. अष्टविनायकांपैकी महड येथील गणेश मंदिर एक आहे. जवळच पालीचा बल्लाळेश्‍वर देखील आहे. महाराष्ट्रातूनच नव्हे तर महाराष्ट्र बाहेरून देखील अष्टविनायक यात्रा करण्यास अनेक भाविक येत असतात. रायगड जिल्ह्यामध्ये पाली चा बल्लाळेश्‍वर आणि महडचा वरदविनायक हा अष्टविनायकातील चौथा गणपती मानला जातो. पाली पासून महाड हे अंतर जवळच आहे. मात्र पाली पाहून झाल्यानंतर अनेक जण मोबाईलवरील गुगल मॅप किंवा गुगल वरील माहितीचा आधार घेऊन प्रवासाला सुरुवात करतात. पालीपासून महाड हे अंतर जवळपास ७० किमी होऊन अधिक आहे. या प्रवासाला साधारण दीड तास लागतो. यामुळे पालीच्या बल्लाळेश्‍वराचे दर्शन घेतल्यानंतर भाविक वरदविनायकाच्या दर्शनाला जाताना गुगल मॅपचा आधार घेतल्यामुळे थेट महाडला येऊन थांबतात.

महाड शहरामध्ये प्रवेश केल्यानंतर गणेश मंदिर कुठे आहे असा प्रश्‍न दररोज ऐकावयास मिळतो. महाड शहरात देखील छोटी छोटी गणेश मंदिरे आहेत. मात्र बाहेरून आलेला पर्यटक ज्यावेळेस गणेश मंदिर कुठे आहे असा प्रश्‍न करतो त्यावेळेस जागरूक महाडकर त्याला तुम्ही चुकून महाडला आला आहात याची जाणीव करून देतो. ज्यांना अष्टविनायक करायचे आहे तो महाड वरून पुन्हा महडकडे जातो. मात्र जे केवळ पर्यटनासाठी आलेले आहेत ते परत न फिरता महाड आणि परिसरातील रायगड किल्ला, गांधार पाले लेणी पाहून पुढे तळ कोकणाकडे जातात.

अनेक वेबसाईटवरदेखील महड याचा उल्लेख महाड असाच आहे. शिवाय गुगल मॅपवरदेखील इंग्रजीमध्ये स्पेलिंग MAHAD अशी टाकली जात असल्याने नकाशा प्रमाणे वाहन चालक थेट महाडला येऊन थांबत आहेत. यामुळे अनेक पर्यटक भाविकांचा वेळ, इंधन वाया जाऊन मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

पालीमध्ये बल्लाळेश्‍वराचे दर्शन घेतल्यानंतर भाविकांनी त्या ठिकाणी महडला जाणारा मार्ग आणि किलोमीटर याबाबत योग्य माहिती घेतली पाहिजे. किंवा प्रशासनाने त्या ठिकाणी योग्य फलकाची सुविधा करणे आवश्यक आहे. गेली काही दिवसांमध्ये महाडमध्ये महडला जाणारे अनेक पर्यटक चुकून आल्याचे निदर्शनास झाले आहे.

# निवडक




## अफगाणांविरूद्ध खेळणार नाही?

**लंडन :** यंदाच्या आयसीसी अजिंक्यपद चषकाचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. ही स्पर्धा फेब्रुवारी-मार्च दरम्यान खेळली जाणार आहे. तत्पूर्वी मोठी माहिती समोर येत आहे. खरे तर १६० हून अधिक ब्रिटिश राजकारण्यांनी इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाला अफगाणिस्तानविरूद्धच्या चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट सामन्यावर बहिष्कार टाकण्याची विनंती केली आहे. तालिबान राजवटीकडून महिलांच्या हक्कांवर होणाऱ्या दडपशाहीविरूद्ध ईसीबीने आवाज उठवला पाहिजे, असे या नेत्यांचे मत आहे. मात्र, यावर इंग्लंड आणि वेल्स क्रिकेटचे प्रत्युत्तर आले आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेटने ही मागणी फेटाळून लावली आहे. अशा प्रकारे २६ फेब्रुवारी रोजी इंग्लंड विरूद्ध अफगाणिस्तान संघात सामना होणार आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेटने तालिबानच्या महिलांविरोधातील कायद्यावर कडाडून टीका केली असली, तरी त्याचा सामन्यावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट केले.




## गौतम गंभीरचे पद धोक्यात?

**नवी दिल्ली :** नव्या वर्षात भारतीय क्रिकेट नियामक मंडळात अनेक बदलांची तयारी केली जात आहे. ज्यासाठी बोर्डाने नुकतेच १२ जानेवारीला मुंबईत विशेष सभेचे आयोजन केले आहे. या बैठकीत बीसीसीआयच्या भविष्याबाबत अनेक मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवाय या सभेत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या कामगिरीवर देखील चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीत गौतम गंभीर आणि त्याच्या सपोर्ट स्टाफच्या कामगिरीवर चर्चा होण्याची शक्यता आहे. हा प्राथमिक मुद्दा नसला तरी अलीकडची कामगिरी पाहता गंभीरच्या कोचिंगबाबत बोर्डातील काही सदस्यांमध्ये असंतोष वाढत आहे. यंदाच्या बॉर्डर-गावस्कर चषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध १-३ ने पराभव झाल्याने भारतीय संघ गंभीर संकटात सापडला आहे. संघाच्या सुमार कामगिरीमुळे गंभीरकडे बोट दाखवले जात आहे.



## आमडोशीत कब्बड्डीचे आयोजन

नागोठणे : रायगड जिल्हा कब्बड्डी असो.च्या मान्यतेने बुधवारी (दि.८) नागोठण्याजवळील आमडोशी येथे जिल्हास्तरीय कब्बड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्‌घाटन दुपारी ४ वाजता मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तसेच, या स्पर्धेमध्ये निमंत्रित ३२ संघाना प्रवेश दिला जाणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. या जिल्हास्तरीय कब्बड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक २५ हजार ५५५ रु. व चषक, द्वितीय क्रमांक १५ हजार ५५५ रु. व चषक, तृतीय क्रमांक व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ११ हजार १११ रु. व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच, सर्वोत्कृष्ट खेळाडूला सायकल, उत्कृष्ट चढाईला कलर फॅन, उत्कृष्ट पकडीला कुलर फॅन व पब्लिक हिरोला स्मार्ट वॉच अशा स्वरूपाची बक्षीस देण्यात येणार आहेत.




## यशस्वी जैसवालचे नशीब चमकले

**नवी दिल्ली :** बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताचा ३-१ असा पराभव झाला. मात्र, यशस्वी जयस्वालसाठी ही मालिका खूप चांगली ठरली. या मालिकेत तो भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. ऑस्ट्रेलियन दौऱ्यावर त्याने एकूण ३९१ धावा केल्या आहेत. मालिकेतील पहिल्या कसोटीत म्हणजेच पर्थमध्ये १६१ धावांची खेळी खेळली होती. आता अशी माहिती समोर येत आहे की, कसोटी मालिकेतील त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी निवडकर्ते जयस्वालला इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय संघात आणि त्यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळण्याची संधी देऊ शकतात.जयस्वालने कसोटी आणि टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण केले आहे. परंतु, आतापर्यंत त्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये पदार्पण केलेले नाही. रोहित शर्माबद्दल आधीच पुष्टी झाली आहे की तो चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये टीम इंडियाचे कर्णधारपद भूषवेल आणि या अहवालानुसार जयस्वालला बॅकअप ओपनर म्हणून भारतीय संघात ठेवण्यात येईल. तर, शुबमन गिल रोहित शर्मासोबत डावाची सुरुवात करणार आहे.

## नेरळ, कशेळे बीटची बाजी

# शिक्षक क्रीडा महोत्सव उत्साहात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत पंचायत समिती शिक्षण विभागाच्यावतीने रायगड जिल्हा परिषद शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांच्या क्रीडा स्पर्धेचे प्रथमच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी वंजारपाडा येथील माथेरान व्हॅली स्कूल यांनी मैदान उपलब्ध करून दिले होते. स्पर्धेत लगोरी, कबड्डी, धावणे, दोरीउडी, गोळाफेक, थाळीफेक, लांबउडी आदी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शिकविणारे ३३० शिक्षक सहभागी झाले होते. त्यात नेरळ आणि कशेळे हे बीट क्रीडा स्पर्धेत आघाडीवर राहिले.

या स्पर्धेत पुरुषांच्या लगोरी गटात प्रथम कशेळे बीट, महिलांमध्ये नेरळ बीट, कबड्डी पुरुष गटात वारे केंद्र तर महिला गटात कशेळे केंद्र यांनी बाजी मारली आहे. तर, दोरीउडी, गोळाफेक, थाळीफेक, लांबउडी आणि धावण्याच्या स्पर्धा या वैयक्तिक स्तरावर घेण्यात आल्या होत्या. दिवसभर चाललेल्या क्रीडा महोत्सवात पंच म्हणून यशवंत वाघरे, जयवंत पारधी, स्वप्नील नामदास, विशाल राठोड यांनी काम पाहिले. तर, स्पर्धेचा बक्षीस समारंभ तालुका गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड, तसेच विस्तार अधिकारी अरुण पारधी, देविदास जाधव, गट समन्वयक किशोर पाटील, समीर येरुणकर आणि मुख्याध्यापक मृदुला पटेल यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी कर्जत शिक्षण विभागाचे केंद्र प्रमुख मोहन पाटील, अरुणा गंगावणे, नारायण सोनावणे, रवींद्र सोनावळे, बाळासाहेब पालवे, पद्माकर म्हात्रे, चंद्रशेखर जूईकर, मंगेश कर्पे, अनंत खैरे, माधुरी पाटील, विभिषण नवले, उज्ज्वला मोरे, विष्णू साबळे, कांचन पाटील आदी उपस्थित होते.



### शिक्षक क्रीडा महोत्सव निकाल

**लगोरी : पुरुष- कशेळे बीट प्रथम, नेरळ बीट द्वितीय. महिला- नेरळ बीट प्रथम, कशेळे बीट द्वितीय.**
**कबड्डी: पुरुष- वारे केंद्र प्रथम, जामरंग केंद्र द्वितीय. महिला- कशेळे बीट प्रथम, नेरळ बीट द्वितीय.**
**धावणे : पुरुष- दिनकर बागुल प्रथम, संभाजी पथारे द्वितीय, यश वेखंड तृतीय. महिला- वैशाली कुटे प्रथम, अर्चना गोड द्वितीय, आंबरे तृतीय.**
**दोरी उडी: अश्विनी गायकवाड प्रथम, सुनीता शितोळे द्वितीय, सुरेखा बोऱ्हाडे तृतीय.**
**गोळा फेक: पुरूष- किशोर बडाख प्रथम, राजेंद्र शिंदे द्वितीय, सचिन पुंड तृतीय. महिला- अनिता कडलग प्रथम, भारती माळी द्वितीय.**
**थाळी फेक: हरिश्चंद्र दहिफळे प्रथम, मोरमारे द्वितीय, विशाल हांडे तृतीय.**
**लांब उडी: संभाजी पथारे प्रथम, सचिन पुंड द्वितीय, राजेंद्र शिंदे तृतीय.**


## अमरहिंद शालेय कबड्डी स्पर्धा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

अमरहिंद मंडळाने दादर येथील मंडळाच्या पटांगणावर शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. मुलांच्या सामन्यात एसआयइएसने ५-५ चढायांत साने गुरुजी मराठी विद्यालयावर ५१-४८ (७-४) अशी मात केली. पूर्ण डावात दोन्ही संघांची ४४-४४ अशी बरोबरी झाली होती. दुसऱ्या सामन्यात आर्यन एज्युकेशनने सोशल सर्व्हिस लिगला ४५-४४ असे चकवित आगेकूच केली आहे. तसेच, पीपल एज्युकेशनने डॉ. एस. कुलकर्णीचा ६३-५३ असा पराभव केला आहे. तर, मारवाडी विद्यालयाने शारदाश्रम विद्यामंदिराचा ५६-३८ असा पाडाव केला आहे. मुलींच्या विभागात सोशल सर्व्हिस लीगने महात्मा गांधींवर ४७-४६ अशी मात करीत दुसरी फेरी गाठली आहे. आंध्र एज्युकेशनने के.एम.एस. इंग्लिश हायस्कूलचा ५९-१७, तर डॉ. आंबेडकरने एन.के.इ. हायस्कूलचा ३६-०५ असा सहज पराभव करीत आगेकूच केली आहे.

## महाराष्ट्राची बाद फेरीत धडक

**| मुंबई | प्रतिनिधी |**




महाराष्ट्राच्या क्रिकेट संघाला विजय हजारे करंडकाच्या साखळी फेरीतील अखेरच्या लढतीत पराभवाचा सामना करावा लागला. रेल्वेच्या संघाने महाराष्ट्राच्या संघावर ३२ धावांनी विजय मिळवला. या पराभवानंतरही महाराष्ट्राच्या संघाने बाद फेरीत प्रवेश केला आहे.

रेल्वेच्या संघाकडून महाराष्ट्राच्या संघासमोर २८५ धावांचे आव्हान ठेवण्यात आले होते; मात्र, महाराष्ट्राच्या संघाचा डाव ४९.४ षटकांत २५२ धावांवरच आटोपला.सिद्धेश वीरने ३४ धावांची, अंकित बावणे याने ६४ धावांची, अझीम काझीने ३५ धावांची, तर निखिल नाईकने ४१ धावांची खेळी साकारली; मात्र, कुणालाही महाराष्ट्राला विजय मिळवून देता आला नाही. पूर्णांक त्यागी याने ५७ धावा देत महाराष्ट्राचा निम्मा संघ गारद केला.

तत्पुर्वी, महाराष्ट्राच्या संघाने या लढतीत नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. रेल्वेच्या संघाकडून दोन खेळाडूंनी अर्धशतकी खेळी करण्यात आली. सूरज अहुजा याने ५५ धावांची आणि साहब युवराज सिंग याने ७९ धावांची खेळी साकारली. आशुतोष शर्मा यानेही ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. महाराष्ट्राच्या संघाकडून प्रदीप दाढे याने ३, तर मुकेश चौधरीने २ फलंदाज बाद केले. रेल्वेच्या संघाने ७ बाद २८४ धावा फटकावल्या होत्या.

# आफ्रिकेसमोर पाकिस्तानची शरणागती

**| केप टाऊन | वृत्तसंस्था |**

दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानवर १० गडी राखून विजय मिळवून मालिका २-० अशी खिशात घातली आहे. दक्षिण आफ्रिकेचा हा सलग सातवा कसोटी विजय असून आता जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा सामना करण्यासाठी सज्ज झाला आहे.



दक्षिण आफ्रिकेच्या रायन रिकेल्टनने पदार्पणाच्या सामन्यात ३४३ चेंडूंचा सामना करताना २५९ धावा कुटल्या. त्याला कर्णधार टेम्बा बवूमा (१०६) व कायले वेरेयने (१००) यांच्या शतकांची साथ मिळाली. मार्को यान्सने (६२) व केशव महाराज (४०) या तळाच्या फलंदाजांनीही पाकिस्तानी गोलंदाजांना झोडले. आफ्रिकेने पहिल्या डावात ६१५ धावा उभ्या केल्या. पाकिस्तानकडून मोहम्मद अब्बास व सलमान आघा यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. त्यानंतर पाकिस्तानचा पहिला डाव अवघ्या १९४ धावांवर गुंडाळून दक्षिण आफ्रिकेने त्यांच्यावर फॉलोऑन लादला. यावेळी, बाबर आझम (५८) आणि मोहम्मद रिझवान (४६) हे अनुभवी खेळाडूच चांगले खेळले. कागिसो रबाडाने ३, तर क्वेमा माफाका व केशव महाराज यांनी प्रत्येकी २ बळी घतले.

दुसऱ्या डावात पाकिस्तानने चांगला खेळ केला.सलामीवीर व कर्णधार शान मसूद व बाबर यांनी संघाला २०५ धावांची सलामी दिली. बाबर ६१ धावांवर माघारी परतल्यानंतर मधळी फळी पुन्हा अपयशी ठरली. रिझवान (४१), सलमान आघा (४८) व आमेर जमाल (३४) यांनी चांगला खेळ करण्याचा प्रयत्न केला. मसूदने २५१ चेंडूंत १४५ धावा केल्या. पाकिस्तानचा दुसरा डाव ४७८ धावांवर गुंडाळला गेला आणि आफ्रिकेसमोर विजयासाठी ६१ धावांचे लक्ष्य ठेवले गेले. आफ्रिकेच्या रबाडा व केशव महाराज यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. अफ्रिकेच्या डेव्हिड बेंडिगहॅम (४७) व एडन मार्कराम (१४) यांनी आफ्रिकेला ७.१ षटकांत विजय मिळवून दिला.

# महाराष्ट्र केसरी स्पर्धेची घोषणा

## रेल्वे, सैन्यदल व ग्रीकोरोमन विजेत्यांना प्रवेश नाकारला

**| कोल्हापूर | प्रतिनिधी |**

अधिकृत महाराष्ट्र केसरी स्पर्धा कोणती, या विषयाभोवती चर्चेचे गुऱ्हाळ रंगलेले असतानाच नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने महाराष्ट्र केसरी स्पर्धेची घोषणा केली आहे. येत्या २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान अहिल्यानगरात ही स्पर्धा होणार असून संघाने रेल्वे, सैन्यदल व ग्रीकोरोमन राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील पदक विजेत्या पैलवानांना स्पर्धेत प्रवेश नाकारला आहे. तसेच, या पैलवानांची संघाला एवढी भीती कशासाठी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



महाराष्ट राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार व सचिव बाळासाहेब लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा होते. या परिषदेच्या कारभारावर ताशेरे ओढत भारतीय कुस्ती महासंघाने अस्थायी समितीची स्थापना केली होती. ही समिती महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या नावाने दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करत आहे. खा. रामदास तडस संघाचे अध्यक्ष, संदीप भोंडवे कार्याध्यक्ष, तर योगेश दोडके सरचिटणीस आहेत. संघाने सर्व शहर जिल्हा संघांना निवड चाचणी स्पर्धा घेऊन गादी व माती विभागातून पैलवानांच्या प्रवेशिका २५ जानेवारीपूर्वी पाठविण्याचे आवाहन केले आहे.

स्पर्धेत ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७ किलो गट असणार आहेत. महाराष्ट्र केसरीचा ८६ ते १२५ किलो गट असेल. कोल्हापूर, सोलापूर, पुणे जिल्ह्यांना स्पर्धेसाठी 'अ' व 'ब' असे दोन संघ पाठविण्यास पात्र ठरविण्यात आले आहे. याआधी संघाने पुणे जिल्ह्यातील फुलगाव येथे ७ ते १० नोव्हेंबर २०२३ ला महाराष्ट्र केसरीची स्पर्धा घेतली होती. त्यात सैन्यदलाचे पाच पैलवान दुचाकीचे मानकरी ठरले होते. अशा अनेक स्पर्धांमध्ये सैन्यदलासह, रेल्वेचे पैलवान मानकरी ठरले आहेत. असे असताना सैन्य व रेल्वेसह ग्रीकरोमन विजेत्या पैलवानांना प्रवेश का नाही, हाच प्रश्न निर्माण झाला आहे.

# गिल 'ओव्हररेटेड' खेळाडू



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**


शुबमन गिल २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. त्या वर्षी त्याने एकूण २,१५४ धावा केल्या; परंतु, पुढच्या वर्षी त्याच्या फॉर्ममध्ये मोठी घसरण झाली. नुकत्याच पार पडलेल्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच डावांत त्याला केवळ ९३ धावा करता आल्या होत्या. आता भारताचा माजी क्रिकेटपटू क्रिस श्रीकांतने गिलवर टीका करत त्याला 'ओव्हररेटेड' म्हटले आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी २०२०-२१ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध नेत्रदीपक शैलीत गिलने कसोटी पदार्पण केले हरेते. त्या मालिकेत त्याने ६ डावात ५१.८ च्या उत्कृष्ट सरासरीने २५९ धावा केल्या होत्या. मात्र, त्यानंतर आशियाबाहेर १८ डावांमध्ये त्याची सरासरी केवळ १७.६४ इतकीच राहिली आहे. परिस्थिती अशी आहे की डिसेंबर २०२२ नंतर गिलला परदेशी भूमीवर एकदाही ४० धावांचा टप्पा गाठता आलेला नाही. तसेच, क्रिस श्रीकांतने ऋतुराज गायकवाड आणि साई सुदर्शन यांनाही संधी देण्याची विनंती केली आहे.

## राज्यस्तरीय गडारोहण स्पर्धा | सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन

# किल्ले रायगडावर स्पर्धेचे आयोजन

**| माणगाव | प्रतिनिधी |**

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ स्थानिक उत्सव समिती महाड यांच्यावतीने राज्यस्तरीय गडारोहण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने रविवारी (दि.१२) सकाळी ७ वाजता किल्ले रायगड येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सर्व वयोगटासाठी असून चित्तदरवाजा, महादरवाजा व हत्ती तलावाच्या डावीकडून होळीचा माळ असा स्पर्धेचा मार्ग असणार आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ३० रुपये असणार आहे. तसेच, नावे नोंदणीसाठी ११ जानेवारी संध्याकाळी ५ वाजता पाचाड धर्मशाळा येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



गडरोहण स्पर्धेकरीता विविध वयोगटांतील गट तयार करण्यात येणार आहेत. त्यात पुरूषांचा प्रथम गट १४ वर्षाखालील मुले, द्वितीय गट १४ ते १७ वर्षापर्यंत, तृतीय गट १७ ते २१ वर्षापर्यंत, चतुर्थ गट २१ ते ३० वर्षापर्यंत, पाचवा खुला गट ३० वर्षांवरील. तर, महिलांचा प्रथम गट १४ वर्षापर्यंत मुली, द्वितीय गट १४ ते १७ वर्षापर्यंत, तृतीय खुला गट १८ वर्षांवरील, असे गट पाडण्यात येणार आहेत. तसेच, स्पर्धेचे पारितोषिक वितरण रविवारी (दि.१२) सकाळी १० वाजता किल्ले रायगड येथे होणार आहे. स्पर्धेतील विजेता स्पर्धकांना प्रत्येक गटांमध्ये पाच बक्षिसे देण्यात येणार आहे. त्यात, प्रथम क्रमांकाला ५ हजार रू., द्वितीय क्रमांकाला ४ हजार रु., तृतीय क्रमांकाला ३ हजार रु., चतुर्थ क्रमांकाला २ हजार रु. व पाचव्या क्रमांकाला १ हजार रु. अशी बक्षीसे दिली जाणार आहेत.

या स्पर्धेमध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन कार्यवाह संतोष कदम यांनी केले आहे. या स्पर्धेत नाव नोंदणी करण्यासाठी महेश गायकवाड (८१४९२४८८७२), अविनाश चव्हाण (९८९०४२३४७८), संतोष माटेकर (७७७४८७८४३२) आदींशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### स्पर्धेचे नियम व अटी

**गडरोहण स्पर्धेसाठी जन्मतारखेचा पुरावा आवश्यक असून त्याला सत्यप्रत जोडावे. पत्रक पूर्णपणे भरल्याशिवाय स्पर्धेत प्रवेश मिळणार नाही. अठरा वर्षाखालील स्पर्धकांच्या पालकांची प्रवेश पत्रावर सही असणे बंधनकारक राहील.स्पर्धकांनी रविवारी (दि.११) सायंकाळी ७ वाजता पाचाड धर्मशाळा या ठिकाणी उपस्थित रहावे. तसेच, या स्पर्धेतील अंतिम निर्णय स्पर्धा संयोजकांचा राहणार आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)